रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १७४
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, ९ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

खोपोलीत पतीकडून पत्नीची गळा दाबून हत्या/२
श्रीवर्धनमध्ये अनधिकृत बांधकामावर कारवाई/५
आयसीसी रँकिंग : ऋषभ पंत पुन्हा टॉप-१०मध्ये/८

## रस्ते अपघातातील जखमींसाठी कॅशलेस ट्रीटमेंट योजना



**नवी दिल्ली :** केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी रस्ते अपघातातील जखमींसाठी कॅशलेस ट्रीटमेंट योजना जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत केंद्र सरकारकडून जखमींचा एकूण १.५ लाखांपर्यंतचा खर्च केला जाईल. अपघात झाल्यापासून सात दिवसांपर्यंतच्या उपचाराचा खर्च सरकार करणार आहे. सध्या या योजनेवर काम केले जात असून मार्चपर्यंत ती अमलात आणण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती त्यांनी दिली. दिल्लीत ना. गडकरींच्या नेतृत्वात सर्व राज्यातील वाहतूकमंत्र्यांची भारत मंडपम येथे बैठक पार पडली. त्या वेळी ते बोलत होते. अपघात झाल्यानंतर २४ तासांच्या आत जेव्हा माहिती पोलिसांपर्यंत जाईल तेव्हापासून संबंधित जखमीचा रुग्णालयातील सात दिवसांचा १.५ लाखांपर्यंतचा उपचार खर्च केला जाईल. हिट अ‍ॅण्ड रन प्रकरणातील पीडितांच्या कुटुंबीयांना दोन लाखांची मदत देऊ, असे ते म्हणाले.

# युवकांनो ड्रग्स फ्री समाज घडविण्यासाठी सैनिक म्हणून पुढे या -मुख्यमंत्री फडणवीस





## नशामुक्त नवी मुंबई अभियानाचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

देशाचे आणि समाजाचे नुकसान करीत असलेल्या न दिसणाऱ्या शत्रूशी लढण्यासाठी समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. ड्रग्स व तत्सम अमली पदार्थांच्या माध्यमातून काही लोक समाज पोखरण्याचे दुष्कर्म करीत आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी सजग राहा, सैनिक म्हणून पुढे या. हीदेखील एक प्रकारची देशभक्ती आणि समाजाची सेवा आहे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. ८) येथे केले.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित वाशी येथील सिडको ऑडिटोरियममध्ये नशामुक्त नवी मुंबई अभियानाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास वनमंत्री गणेश नाईक, प्रख्यात अभिनेता आणि नशामुक्त नवी मुंबई या उपक्रमाचा आयकॉन जॉन अब्राहम, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार मंदा म्हात्रे, आमदार विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, संजय येनपुरे, पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, प्रशांत मोहिते, रश्मी नांदेडकर, संजयकुमार पाटील, महाविद्यालयीन विद्यार्थी, नशामुक्तीचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ड्रग्समुळे स्वतःच्या आयुष्यासोबत आपण देशाचेही नुकसान करतो हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. प्रवाहासोबत जाणारे अनेक असतात, परंतु चांगले करण्यासाठी प्रवाहाविरुद्ध जावे लागते. त्याकरिता शारीरिक ताकदीपेक्षा मानसिक ताकद गरजेची आहे. नशामुक्त नवी मुंबई हे अभियान अतिशय महत्त्वाचे आहे. गृहखात्याच्या पहिल्याच बैठकीत पोलिसांना सांगितले की, आपल्याला ड्रग्सविरुद्ध मोठी लढाई लढायची आहे. सरळ लढाई करता येत नाही म्हणून अमली पदार्थांच्या माध्यमातून देश पोखरण्याचा प्रयत्न केला जातोय.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढे म्हटले की, देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी गृह विभागासंबंधी घेतलेल्या बैठकीत कॅनडाचे उदाहरण दिले. ड्रग्जमुळे कॅनडा सामाजिकदृष्ट्या पूर्णपणे कोलमडून पडला, मात्र भारत ड्रग्जविरुद्धची ही लढाई जिंकू शकतो. देशातील सर्व राज्यांनी एकमेकांना सहकार्य करीत ही लढाई एकत्र लढायला हवी. सर्वांनी एकत्र येऊन संपूर्ण भारत ड्रग्समुक्त करायचा आहे, हा आपला निर्धार असायला हवा. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून जाहीर करण्यात आलेल्या ८८२८११२११२ या टोल फ्री क्रमांकाचा प्रभावी वापर करा.

नशामुक्तीसाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने घेतलेल्या पुढाकाराबद्दल मुख्यमंत्र्यांनी नवी मुंबई पोलीस दलाचे अभिनंदन केले तसेच सेलिब्रिटी म्हणून जॉन अब्राहम यांच्या कामाबद्दलही कौतुक केले आणि पुन:श्च एकदा निर्धार करूया नशामुक्तीसाठी लढण्याचा, ड्रग्स फ्री नवी मुंबई करण्यासाठी सैनिक होण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

अभिनेता जॉन अब्राहम याने नशामुक्त नवी मुंबई या अभियानाच्या आयोजनाबद्दल नवी मुंबई पोलिसांचे अभिनंदन करून आपले आयुष्य हे शिस्तमय असावे. आपण आपल्या आचरणाने मित्र परिवारामध्ये आदर्श निर्माण करावा आणि एक उत्तम नागरिक म्हणून जगावे, असे आवाहन उपस्थित युवकांना केले. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी प्रास्ताविकात केले.

### चांगल्या कामाचा ध्यास हीच खरी नशा -मंत्री गणेश नाईक

या वेळी वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, चांगल्या कामाचा ध्यास हीच खरी नशा आहे. सर्वांनी चांगल्या कामाचा ध्यास घ्यावा. नवी मुंबई महापालिका सर्व आघाड्यांवर प्रथम क्रमांकावर आहे तसेच नशामुक्त अभियानातही अव्वल राहील, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात रिझल्ट ओरिएंटेड महाराष्ट्र घडेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## एक देश, एक निवडणूक समितीची पहिली बैठक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील लोकसभा आणि सर्व राज्यांतील विधानसभा निवडणुका एकत्र घेण्याची तरतूद असलेल्या दोन विधेयकांवर विचारविनिमय करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जेपीसी अर्थात संयुक्त संसदीय समितीची पहिली बैठक बुधवारी (दि. ८) झाली. पहिलीच बैठक असल्याने विधेयकाबाबत केवळ औपचारिक चर्चा झाली.

या वेळी कायदा मंत्रालयाने समितीच्या सदस्यांना या दोन्ही विधेयकांची माहिती दिली. सर्व अहवाल सुपूर्द करण्यात आला आहे. या दोन्ही विधेयकांवर पुढील बैठकीपासून सविस्तर चर्चा सुरू होईल.

सरकारने वन नेशन वन इलेक्शनबाबत अभ्यास करण्यासाठी ३९ सदस्यांच्या संयुक्त संसदीय समितीची स्थापना केली आहे. या समितीमध्ये भाजपचे १६, काँग्रेसचे पाच, समाजवादी पार्टी, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुकचे प्रत्येकी दोन, शिवसेना, टीडीपी, जेडीयू, आरएलडी, एलजेपी (रामविलास), जनसेना पार्टी, शिवसेना (उबाठा), एनसीपी (एसपी), माकप, आप, बीजू जनता दल आणि वायएसआर काँग्रेस यांच्या प्रत्येकी एका सदस्याचा समावेश आहे. समितीत लोकसभेचे २७ आणि राज्यसभेचे १२ खासदार आहेत. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात ही दोन्ही विधेयक सादर करण्यात आली आहेत.



### सदस्यांना विधेयकाच्या माहितीसह अहवाल सुपूर्द

भाजपचे खासदार पी.पी. चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील या समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये कायदे मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी जेपीसीच्या सदस्यांना दोन्ही प्रस्तावित कायद्यामधील तरतुदींची माहिती दिली. या बैठकीला काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी ह्याही उपस्थित होत्या.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार वन नेशन-वन इलेक्शनच्या पहिल्या बैठकीमध्ये समितीचा कार्यकाळ वाढवण्याच्या विषयावर सर्व सदस्यांमध्ये एकमत झाले. त्याबाबतचा प्रस्ताव हा पुढच्या अधिवेशनात दिला जाईल. या समितीला अर्थसंकल्पीय अधिवेशाच्या शेवटच्या आठवड्यातील पहिल्या दिवसापर्यंत आपला अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. दरम्यान, वन नेशन वन इलेक्शनबाबतचे विधेयक १७ डिसेंबर रोजी लोकसभेत सादर करण्यात आले आले होते.

## निवडक

### आणखी दोन जहाल महिला नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

**गडचिरोली :** नववर्षाच्या पहिल्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर महिला नक्षल नेता तारक्कासह ११ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले होते. यानंतर बुधवारी (दि. ८) आणखी दोन जहाल महिला नक्षलवाद्यांनी हिंसक चळवळ सोडून मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला. सेक्शन कमांडर शामला झुरू पुडो उर्फ लीला (३६, रा. गट्टेपल्ली ता. एटापल्ली) व भामरागड दल सदस्य काजल मंगरु वड्डे उर्फ लिम्मी (२४, रा. नेलगुंडा) अशी त्यांची नावे आहेत. या दोघींवर मिळून तब्बल ५३ गुन्हे नोंद असून १० लाखांचे बक्षीस होते.

### अवघ्या आठ वर्षांच्या मुलीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**बंगळुरू :** आठ वर्षांच्या एका मुलीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना कर्नाटकच्या चामराज नगर तालुक्यातील बदानुप्पे गावात घडली. श्रुती-लिंगराजू यांची मुलगी तेजस्विनी ही शाळेत शिक्षिकेला वही दाखवत असताना अचानक कोसळली आणि तिचा मृत्यू झाला. या घटनेबद्दल हळहळ व्यक्त होत आहे.

## रोह्यात अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीला अटक



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात वरसे येथे एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली असून आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, वरसे गावातील महिला व ग्रामस्थांनी रोहा पोलीस ठाण्यासमोर जमून आरोपीला कडक शिक्षा करावी आणि मुलीला न्याय मिळाला पाहिजे, अशी मागणी उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र दौंडकर यांच्याकडे केली.

रोहा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी तेजस गणेश पडवळ (वय ३०, रा. वरसे) याने घरात पत्नी नसताना १३ वर्षीय मुलीला घरात बोलवून तिचा विनयभंग केला. या घटनेची नोंद रोहा पोलीस ठाण्यात होऊन आरोपीला पोलिसांनी अटक केली असून त्याच्याविरोधात पोक्सो अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थ रोहा पोलीस ठाण्यासमोर जमले आणि त्यांनी आरोपीला कठोर शिक्षा करण्याची मागणी केली. यावर बोलताना उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र दौंडकर यांनी सांगितले की, पीडित मुलीला शंभर टक्के न्याय मिळेल. वरसे ग्रामस्थांनी काळजी करू नये. आरोपीविरोधात अनेक तक्रारी आलेल्या आहेत. त्यांचादेखील कसून तपास चालू आहे. आरोपीवर कठोरात कठोर गुन्हे दाखल करून तपास फास्ट ट्रॅकवर चालविला जाईल यासाठी निश्चित प्रयत्न केले जातील.

दरम्यान, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी वरसे येथे भेट देऊन घटनेचा आढावा घेतला.

## सीकेटी विद्यालयात स्नेहसंमेलन रंगले

■ मान्यवरांची उपस्थिती; विद्यार्थ्यांकडून सांस्कृतिक कार्यक्रम सादर







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. ७) 'रंग मराठी कलाकारांचा' या संकल्पनेवर आधारित स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात झाले. या सोहळ्याला संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे कार्यकारिणी सदस्य संजय भगत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या स्नेहसंमेलनाला मुंबई पूर्व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या उपनिरीक्षक भक्ती गोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या वेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रास्ताविकात शाळेचे मुख्याध्यापक कैलास सत्रे यांनी विद्यालयाच्या विविध उपक्रमांची तसेच या वर्षी विद्यालयाला जिल्ह्यात 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हा पुरस्कार प्राप्त झाला असल्याची माहिती दिली.

विद्यालयातील विविध स्पर्धा आणि परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना या वेळी बक्षिसे देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी रंग मराठी कलाकारांचा या विषयाला अनुसरून स्नेहसंमेलनामध्ये नृत्याविष्कार सादर केले.

स्नेहसंमेलनाला माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, सुभाष मानकर, नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, कैलास म्हात्रे यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## अवैध मासेमारी रोखण्यासाठी ड्रोन प्रणालीचा वापर

### रायगडात वरसोली बीच व मुळगाव जेट्टी येथून होणार उड्डाण

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कोकणातील अवैध मासेमारी रोखण्यासाठी अत्याधुनिक ड्रोन प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. अशा पद्धतीची आधुनिक यंत्रणा राज्यात प्रथमच अमलात येत असून रायगड जिल्ह्यातील अलिबागमधील वरसोली बीच येथील मैदान आणि श्रीवर्धनच्या मुळगाव जेट्टी येथून ड्रोन प्रणालीचे उड्डाण करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय संजय पाटील यांनी दिली.



राज्याच्या जलधीक्षेत्रात होत असलेली अवैध मासेमारी रोखण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सुधारित २०२१) हा कायदा अंमलात आला आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता विभागाकडे असलेल्या गस्ती नौकांमार्फत गस्त घालून कार्यवाही करण्यात येत असते, पण गस्ती नौकेद्वारे समुद्रात गस्त घालत असताना प्रत्येक नौकेची तपासणी करणे शक्य होत नाही तसेच अनधिकृत नौकांचा पाठलाग करीत असताना त्या पळून जात असतात. अशा नौकांना पकडणे जिकरीचे होते. गस्ती नौकेसोबतच ड्रोनचा वापर केल्यास अनधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांची पुराव्यासह माहिती विभागास उपलब्ध होण्यास मदत होणार आहे व अशा नौकांवर कारवाई करणे सोईचे होईल.

ड्रोन प्रणालीचा रायगड जिल्ह्याच्या १२२ किमी लांबीच्या समुद्र किनाऱ्यापासून राज्याच्या सागरी हद्दीपर्यंत म्हणजे १२ सागरी मैल अंतरापर्यंत वापर करण्यात येणार आहे.

### नियंत्रण कक्षाचे आज उद्घाटन

राज्यातील सात सागरी जिल्ह्यात नऊ ठिकाणी ड्रोन प्रणालीचे उड्डाण व आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयातील नियंत्रण कक्षाचे उद्घाटन ९ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते होणार आहे. ड्रोन आधारित देखरेख व डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्र प्रणाली भाडेपट्टीने घेण्यात आली आहे. रायगडसह कोकणातील सात जिल्ह्यात सात ड्रोन कंट्रोल रुम्सच्या माध्यमातून नऊ अत्याधुनिक ड्रोनची नजर राहणार आहे. रायगडातील रेवदंडा व श्रीवर्धन या दोन ठिकाणी ही सेवा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून घेण्यात आली आहे. आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयात ड्रोन आधारित देखरेख व डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्र प्रणालीचा कंट्रोल रूम आहे.

## खारघरमध्ये बिबट्याचा वावर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमध्ये मोठ्या प्रमाणात कोल्हे पाहिले जात असताना मागील दोन दिवसांपासून खारघर हिलवर एक बिबट्या मुक्त संचार करीत असल्याचे येथील आदिवासी वाडीतील लोकांनी पाहिले. वनविभागाने या वृत्ताला दुजोरा दिला आहे.



खारघर टेकडीवर फणसवाडी, चाफेवाडी या दोन आदिवासी वाड्या आहेत. दररोज कामानिमित्त येथील रहिवाशांना खारघर हिलवरून खाली ये-जा करावी लागते. ८ जानेवारी रोजी पहाटे ६ वाजतादेखील काही तरुणांना कामावर जाताना बिबट्या दिसून आला. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली.

दरम्यान, वनविभागाने याबाबत तत्काळ उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी वनविभागाकडे केली असल्याचे माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांनी म्हटले आहे. पनवेल वन परिक्षेत्राचे अधिकारी गजानन पानपट्टे यांनी या संदर्भात आवश्यक ती पावले उचलत आहोत, असे सांगितले.

## जोरदार थंडीने महाराष्ट्र गारठला!

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पुन्हा थंडीचा जोर वाढू लागला आहे. वाऱ्याची चक्राकार दिशा आणि अरबी समुद्रात आर्द्रता यामुळे बहुतांश जिल्ह्यातील किमान तापमानात घट झाली आहे.



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार उत्तरेकडील थंड वाऱ्यांमुळे राज्यात गारठा परतला आहे. उत्तर महाराष्ट्रात किमान तापमानाचा पारा १० अंशांच्या खाली आला आहे. राज्याच्या किमान तापमानात २ ते ३ अंशांनी घट होण्याचा अंदाज असल्याने थंडीही वाढेल, असे हवामान विभागाने म्हटले आहे.

मुंबईत मंगळवारी वेगवेगळ्या भागात १५ ते १९ अंश तापमान होते. मुंबईतील थंडीची तीव्रता पुढील दोन दिवस कायम राहणार आहे. सध्या मुंबईत सर्वत्र धुक्याची चादर पसरली असून दृष्यमानताही कमी झाली आहे. पुण्यात किमान तापमानाचा पारा १० अंशांच्या आसपास आहे. राज्यात गारठा वाढण्याची तसेच कमाल तापमानात चढ-उतार होण्याचा अंदाज आहे.

**पावसाची शक्यता**

उत्तर महाराष्ट्रात थंडीचा जोर वाढला असून जळगाव जिल्ह्यात पारा ८ अंशापर्यंत खाली आला आहे. दोन दिवस थंडीचा जोर वाढणार असला तरी उत्तर महाराष्ट्रासह मराठवाड्यात पावसाची शक्यता आहे.

# ‘देशाची भावी पिढी घडविण्यात शिक्षकांचा सिंहाचा वाटा’



**पेण : रामप्रहर वृत्त**

आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगातही नवनवीन ज्ञान देत विद्यार्थी घडविणारे पेण व अलिबाग तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांचे शैक्षणिक कार्य महान आहे.रायगड जिल्ह्याचा आर्थिक प्रगतीचा आलेख उंचावण्याच्या कामात या गुरुजनांचा सिंहाचा वाटा आहे.असे शिक्षकाप्रती कृतज्ञतेचे वचार राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी पेणमधील शिक्षक संघ वर्धापन दिनानिमित्त समारंभात व्यक्त केले.

अखिल भारतीय शिक्षक संघ पेणचा वर्धापन दिन सोहळा पेणच्या आगरी समाज सभागृहात संपन्न झाला. या प्रसंगी आमदार रविशेठ पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा नीलिमा पाटील, झेडपी सदस्य हरिओम म्हात्रे, माजी नगरसेवक शोमेर पेणकर, माजी सरपंच कमलाकर मोकल, मच्छींद्र पाटील, गटविकास अधिकारी लता मोहिते, गटशिक्षण अधिकारी अरुणादेवी मोरे, रायगड जिल्हा प्राथमिक संघाचे सोपान चांदे, शिक्षक पतसंस्था अध्यक्ष विठोबा पाटील, जिल्हा संघटक अमरचंद पाटील, उपाध्यक्ष आदिनाथ पाटील, नंदकुमार थवई, मोहन भोईर, सर्व केंद्र शाळा प्रमुख, प्राथमिक शाळांचे शिक्षक, विद्यार्थी आणि आयोजन समितीचे सदस्य अशी उपस्थिती होती.

ज्ञान ही मोठी शक्ती आहे आणि शिक्षण हे सर्वांगीण सुधारणेच प्रवेशद्वार आहे. रायगड जिल्ह्यातील प्रगतीच्या वळणवाटांना आपल्या शिष्यांना संस्कारित शिक्षणाचे धडे देत जिल्ह्याच्या सामाजिक शैक्षणिक आर्थिक प्रगतीचा मापदंड ज्या गुरुजनांनी कालपरत्वे निर्माण केला त्या शिक्षकांचे शैक्षणिक कार्य महान असल्यचे खासदार धैर्यशील पाटील यांनी यावेळी सांगितले.

आमदार रविशेठ पाटील यांनी शिक्षकांचे महत्व अधोरेखित करताना वसिष्ठ ऋषींनी श्रीरामाला घडविले. एक आदर्श राजा,जनतेच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करून राज्यशासन चालविणारा राजा म्हणून आजही प्रभूरामांच रामराज्य भारतीयांच्या मनावर कायम बसलेल आहे. हे केव्हा शक्य झाले तर आदर्श आणि ज्ञान देणारे गुरु वसिष्ठ ऋषींच्यामुळे. शिक्षक पेशातील डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी भारताचे दुसरे राष्ट्रपती म्हणून सलग पाच वर्षे देशाच सर्वोच्च पदावर जबाबदारीने काम केले आहे. आईनंतर मुलांना शिक्षण देणारे गुरु मानवी जीवनात समाज संस्कृती, नवे जुनं अस ज्ञानाची मोट बांधून राष्ट्राची भावी पिढी घडविण्याचे काम करुन देशाच्या प्रगतीचे मापदंड उंचावतात या गुरुवर्यांना माझा दडंवत असल्याचे सांगितले

यावेळी पेण तालुक्यातील सुंदर शाळा आदर्श शिक्षक, निवृत्त आदर्श शिक्षक शिक्षिका यांना खासदार, आमदार व व्यासपिठावरील मान्यवर मंडळींच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# खोपोलीत पतीने पत्नीची गळा दाबून केली हत्या

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लवजी उदय विहार परिसरातील सुखकर्ता अपार्टमेंटमधील चौथ्या माळ्यावर राहणाऱ्या गणेश घोडके (३२) याने आपली पत्नी शितल (२८) हिचा कापडी ओढणीने गळा आवळून खून केल्याची घटना बुधवारी सकाळी घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. पती गणेश घोडके हा फरार झाला आहे.

खोपोली हद्दीतील लवजी, उदयविहार विभागातील सुखकर्ता अपार्टमेंटमधील चौथ्या माळ्यावर राहणाऱ्या गणेश घोडके याने आपली पत्नी शितलचा कापडी ओढणीने गळा आवळून खून करून तिचा मृतदेह बाथरूम मधील एका कोपऱ्यात ठेवून त्यावर कपडे रचून ठेवले. आणि दरवाजा बंद करून पळून गेला.

या घटनेची खबर शेजारील नागरिकांनी दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. आरोपी सातारा परिसरात पळून गेल्याची माहिती




मिळत आहे ,पोलिसांचे पथक त्या भागात रवाना करण्यात आले आहे .

उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी घटनास्थळी भेट देउन अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. घटनास्थळी अलिबागचे फॉरेन्सिक पथक त्याचप्रमाणे श्वान पथक दाखल झाले होते. पोलीस निरीक्षक शीतलकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज ठाकरे पुढील तपास करीत आहे. सदर दांपत्याला लग्नाला पाच वर्षे होऊन मुल बाळ नव्हते अशी माहिती मिळत आहे. मात्र पतीने कुठल्या कारणास्तव पत्नीचा खून केला असावा हे मात्र गुलदस्त्यात आहे, पोलीस तपासानंतर या घटनेचा उलघडा होईल, असे समजते.

# सीकेटी कॉलेजमध्ये कचरा व्यवस्थापन आणि खारफुटी संवर्धन विषयावर कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नवीन पनवेल (स्वायत्त) येथे कचरा व्यवस्थापन आणि खारफुटी संवर्धन या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि युनायटेड वे मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार ८ जानेवारी रोजी कचरा व्यवस्थापन आणि खारफुटी संवर्धन या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी आजीवन अध्ययन व विस्तार विभागचे समन्वयक प्रो. (डॉ.) बी. एस.पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ. प्रियंका जुन्दारे (पर्यावरण समन्वयक) आणि डॉ. श्रद्धा सावंत (क्षेत्रीय अधिकारी) यांनी सर्व विद्यार्थ्यांना कचरा व्यवस्थापन आणि खारफुटी संवर्धन या विषयावर मार्गदर्शन केले.

या कायर्क्रमात कचरा व्यवस्थापन ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आणि समुद्रातील वनस्पती, पक्षी, प्राणी इत्यादी घटकासाठी खारफुटी संवर्धनाची गरज याबाबत विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी आजीवन अध्यन व विस्तार विभागाच्या एकूण ८६ विद्यार्थ्यानी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील, आय. क्यू.ए.सी.समन्वयक प्रो.(डॉ.) बी.डी.आघाव, यांनी कौतुक केले. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. एच.एस खरात, (डॉ). के.बी.ढोरे, प्रा.अतुल घाडगे, प्रो. कुशल कुराणी, प्रा. पूनम शिंदे, अनुप्रिता वाठारकर, प्रा. स्नेहा आर. पारिंगे आणि प्रा. नेहा एस. पोरजी, प्रा.स्वेता व्ही. हुंबरवाडी, आणि प्रा. सागर व्यवहारे, यांनी अथक परिश्रम घेतले.

# ‘अजून मला जगायचे आहे’ पुस्तकाचे प्रकाशन

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी हंगामी विधानसभा अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांच्या हस्ते उरणचे रहिवासी जेष्ठ साहित्यिक शिवनाथ गायकवाड यांच्या अजून मला जगायचे आहे या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रकाशनावेळी कोळंबकर यांनी कामगार क्षेत्रातून सामाजिक संस्कृतिक साहित्यिक क्षेत्रातून पुढे आलेल्या गायकवाड यांना शुभेच्छा दिल्या.



शिवनाथ गायकवाड यांचे यापूर्वी ’पाण्यावरचे अनुभव या पुस्तकाला चांगलाच प्रतिसाद मिळाला होता. दिवाळी अंक, वृत्तपत्र लेखणाच्या माध्यमातून लेखणीला सुरवात करून लघुकथा व बाल वांघमय यांचा सुरेख संगम साधला आहे. शिवनाथ यांना अनिल रघुनाथ राय स्मृती पारितोषिक तसेंच पद्मश्री नारायण सुर्वे स्मृती ठाणे पारितोषिक मिळाले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचा गुणवंत कामगार पुरस्कार २००९ ठाणे गुणिजन पुरस्कार २०११ ठाणे महानगर पालिका मिळाले आहेत.

त्यांना महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, निवृत्त न्यायाधीश चंद्रशेखर धर्माधिकारी, माजी गृहमंत्री आर आर पाटील, कामगार नेते डॉ. शान्ति पटेल पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, डॉ. प्रकाश बाबा आमटे, मुंबईच्या माजी महापौर शुभा राऊळ, ठाण्याच्या माजी महापौर स्मिता इंदुलकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले आहे.

# कडाव मंडल अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहात पकडले

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील दहिगाव येथे खरेदी केलेल्या जमिनीचा फेरफार मंजूर करण्यासाठी कडाव येथील मंडल अधिकाऱ्याने खरेदीदाराकडे एक लाख रुपयांची मागणी केली होती. त्यानुसार ठाणे परिक्षेत्र लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी बुधवारी (दि. ८) सापळा रचून लाचेची रक्कम घेताना रांगेहात पकडले. चंद्रकांत ठकाजी केंडे असे या लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील यांनी अप्पर पोलीस अधीक्षक संजय गोविलकर, गजानन राठोड, सुहास शिंदे या मार्गदर्शक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक शशिकांत पाडावे, सहाय्यक फौजदार विनोद जाधव, अरुण करकरे, पोलीस हवालदार महेश पाटील, सचिन आटपाडकर, सागर पाटील यांच्या पथकाने हा सापळा रचला व लाचखोल मंडल अधिकारी चंद्रकांत केंडे यांना ताब्यात घेतले आहे.

# युवा दिनानिमित्त दि.बा. पाटील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत स्पर्धा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्याच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्यावतीने, दि १२ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद जंयती निमित्त दि. बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बेलापूर येथे राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात येणार आहे.

यावेळी युवकांच्या विविध गुणांना तसेच कौशल्यांना वाव मिळावा व प्रोत्साहन मिळावे यासाठी दि. बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बेलापूर येथे दिनांक ०९ ते ११ जानेवारी २०२५ या कालावधीत संस्थेमध्ये कॅरम, बुध्दीबळ, चित्रकला व निबंध अशा विविध स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. दि. १० जानेवारी २०२५ रोजी श्री. आदित्य कारखानिस सहाय्यक निर्देशक, श्रम मंत्रालय, मुंबई भारत सरकार यांचे मार्फत अनुसुचित जाती/ अनुसुचित जमातीच्या वर्ष १८ वयोगटातील प्रशिक्षणार्थ्यांसाठी एक दिवसीय उद्योजकता जागृकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

डॉ. स्नेहल म्हात्रे, तेजज्ञान फाऊंडेशन पुणे, ध्यान ज्ञान केंद्र पनवेल यांचे १२ जानेवारी २०२५ रोजी स्वामी विवेकानंद व त्यांचे विचार यावर मार्गदर्शन होणार आहे. तसेच या स्पर्धांमध्ये विजय प्राप्त केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचा गौरव करून त्यांना प्रशस्ती पत्रक आणि पुरस्कार देण्यात येणार आहे.या स्पर्धांमध्ये जास्तीत प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घ्यावा,असे आवाहन दि. बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बेलापूर जि. ठाणेचे प्राचार्य स.ज.पाटील यांनी प्रसिध्द पत्रकाद्वारे केले आहे.



**मुंबई : मुंबई मराठी पत्रकार संघाने प्रकाशित केलेल्या २०२५ या वर्षाच्या दिनदर्शिकेसाठी आर्थिक पाठबळ दिल्याबद्दल संघाचे माजी अध्यक्ष नरेंद्र वि. वाबळे यांचा पत्रकार दिनी महनीय प्रवक्ते महावीर जोंधळे यांच्या हस्ते पत्रकार संघात सत्कार करण्यात आला.**

# मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पुरस्कारांचे वितरण

**मुंबई : प्रतिनिधी**

पत्रकार दिन सोहळ्यात मुंबई पत्रकार संघाच्या वतीने पत्रकारितेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल विविध पत्रकारांना महनीय प्रवक्ते आणि ज्येष्ठ संपादक महावीर जोंधळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या वेळी निवडणूक अंदाज स्पर्धेतील विजेत्यांचाही सन्मान करण्यात आला. पत्रकार संघाने घेतलेल्या छायाचित्र स्पर्धेतील विजेत्यांचाही या वेळी सन्मान करण्यात आला आणि महावीर जोंधळे यांच्या हस्ते या छायाचित्रांच्या दिनदर्शिकेचेही प्रकाशन करण्यात आले.

या वेळी मुंबई पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, राजेंद्र हुंजे खजिनदार जगदिश भुवड, विश्वस्त वैजयंती आपटे, राही भिडे, देवदास मटाले, कार्यकारिणी सदस्य आत्माराम नाटेकर, अंशुमन पोयरेकर, देवेंद्र भोगले, किरीट गोरे तसेच अंतर्गत हिशेब तपासनीस हेमंत सामंत आदी उपस्थित होते.

वेळी त्यांच्या हस्ते मंगेश मोरे (आप्पा पेंडसे पत्रकारिता पुरस्कार), घनश्याम भडेकर (जयहिंद प्रकाशन पुरस्कार), सचिन लुंगसे (कॉ. तु. कृ. सरमळकर पुरस्कार), विनोद राऊत (विद्याधर गोखले स्मृती पुरस्कार) आणि पांडुरंग म्हस्के (नवसंदेशकार रमेश भोगटे स्मृती पुरस्कार) यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. निवडणूक अंदाज स्पर्धेतील विजेते नंदू धुरंधर, संजीव उपरे, छायाचित्र स्पर्धेचे संयोजक अंशुमन पोयरेकर यांचाही या वेळी सन्मान करण्यात आला.

# विद्यार्थ्यांनी घेतली पोलीस प्रशासकीय कामकाजाची माहिती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलिस स्थापना दिन म्हणून ०२ जानेवारी ते ०८ जानेवारी या कालावधीत पोलीस ठाणे हद्दीत विविध कार्यक्रम आयोजित करून पोलिस स्थापना सप्ताह साजरा करण्यात येतो.

यानिमित्ताने रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील पिल्लई एचओसी ऑफ आर्ट्स,कॉमर्स, सायन्स कॉलेज रसायनी येथील विध्यार्थ्यांना शनिवार दि.४ रोजी रसायनी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय बांगर यांनी पोलीस प्रशासकीय कामकाजाबाबत माहिती दिली.

यात पोलिस ठाण्यातील कामकाजासह रोड सेफ्टी,सायबर क्राईम बाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.यावेळी जवळपास १५० विध्यार्थांनी पोलिस कामकाजाबाबत माहिती जाणून घेतली.याप्रसंगी रसायनी पोलिस ठाण्याचे गोपनीय पोलिस राहूल भडाले ,शिक्षकवर्गासह विद्यार्थी उपस्थित होते.



# गोवर्धनी माता मंदिरात होम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सुमारे ३०० वर्षापूर्वीचे पुरातन पेशवेकालीन मंदिर म्हणून आई गोवर्धनी माता मंदिराची आख्यायिका आहे. मंगळवारी (दि.७) आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते आई गोवर्धनी मातेची विधिवत पूजा झाली. माजी नगरसेवक निलेश म्हात्रे व पत्नी स्वाती म्हात्रे यांच्या शुभहस्ते नवचंडी होम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या वेळी हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



आई गोवर्धनी मातेची प्राणप्रतिष्ठापना पेशवेकाळात झाली. नवी मुंबईसह संपूर्ण पंचक्रोशातील भाविक भक्तांच्या नवसाला पावणारी आई गोवर्धनी माता सुप्रसिद्ध आहे. आई गोवर्धनी माता मंदिर हे निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केलेल्या निसर्गरम्य टेकडीवर वसलेले असून हिरवळीने नटलेले आहे. मंदिराच्या पाठीमागे विस्तीर्ण असा समुद्र लाभलेला आहे. या पुरातन मंदिराच्या जीर्णोद्धार १५ वर्षापूर्वी उद्योजक विजय नारायण म्हात्रे व आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या शुभहस्ते करण्यात आला होता.

# शिरवणे येथे रक्तदान महायज्ञ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थान, श्रीक्षेत्र नाणीजधाम, रत्नागिरी अंतर्गत नवी मुंबईतील शिरवणे सेवा केंद्राच्या वतीने ५ जानेवारी रोजी स्वयंभु गणेश मंदिर, शिरवणे येथे आयोजन करण्यात आलेल्या रक्तदान महायज्ञामध्ये १६२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असून हे सामाजिक कार्य होत असल्याने सर्व स्तरांतून रक्तदान महायज्ञाचे स्वागत होत आहे. तुम्ही जगा दुसऱ्याला जगवा या शिकवणीला अनुसरून संस्थानाच्या माध्यमातून विविध समाजपयोगी उपक्रम राबविण्यात येत असल्याचे माजी महापौर जयवंत सुतार यांनीसांगितले

या वेळी माजी नगरसेविका माधुरी सुतार, सामाजिक कार्यकर्त्या निर्मला सुतार, नंदकुमार आदक, महेश बांद्रे, किशोर बेंडे, सुदर्शन राठोड, मिनाक्षी हिलाल, पुष्पा डोलकर, रमेश भांडे,



अशोक पाटील, रमेश पवार, अमीर शिंदे, सुनील भोजने, सिमा जगताप, प्रिया रजक, शरयु बेंडे, तृप्ती गरुड, सिद्धेश घाडगे, विनीत खाडे तसेच सदस्य व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### दुचाकी झाडावर आदळून चालकाचा मृत्यू

**पनवेल :** रस्त्यावर भरधाव वेगात दुचाकी चालवताना वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी रस्त्याकडेच्या आंब्याच्या झाडावर धडकून झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला.किरण लाला बोरसे (२४) असे त्याचे नाव असून तो पनवेलमधील विहिघर येथे राहत होता. किरण हा दुचाकीने पनवेल-माथेरान रोडने आपल्या घरी जात होता. यावेळी वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी रस्त्याच्या बाजूला असलेल्या आंब्याच्या झाडावर जाऊन आदळली. या अपघातात किरण गंभीर जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, तेथे त्याच मृत्यू झाला. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून गुन्हा दाखल केला आहे.

### तरुणीचा विनयभंग

**पनवेल :** पायी जाणाऱ्या एका तरुणीच्या जवळ दुचाकी आणून तिच्या अंगावर पाठीमागून अनोळखी रोडरोमिओने हात फिरवून तो पसार झाल्याची घटना नवीन पनवेल परिसरात घडली आहे. सदर तरुणी ही कामावरुन घरी जात असताना दुचाकीवरुन जाणारा एक तरुण तिच्या जवळ आला व सदर तरुणीचा विनयभंग करून पसार झाला आहे. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### महिला बेपत्ता

**पनवेल :** घरात झालेल्या किरकोळ वादातून रागाच्या भरात एक ५८ वर्षीय महिला कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याची तक्रार रबाळे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.निरु गणेश पाटील (५८) असे या महिलेचे नाव असून उंची ५ फुट ५ इंच, रंग सावळा, डोक्याचे केस काळे लांब, डोळे काळे, नाक सरळ, बांधा मध्यम असून अंगात पिंक कलरची साडी, निळ्या रंगाचा ब्लाऊज घातलेला आहे. तसेच त्यांना मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी रबाळे पोलीस ठाणे दुरध्वनी क्र.०२२-२७६०६१६२ किंवा पो.हवा.संदीप नवले मो. नं.९८६७७८२२७० येथे संपर्क साधावा.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल परिसरात एका ३५ वर्षीय इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.संजय जशराज पांडे (३५) असे या इसमाचे नाव असून रंग गोरा, अंगाने सडपातळ, केस काळे तसेच दाढी मिशी काळी वाढलेली असून, अंगात लाल रंगाचा फुल बाह्याचा टी-शर्ट व ग्रे रंगाची फुल पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी क्र.२७४५२३३३ किंवा पो.उपनि.उद्धव सोळंके यांच्याशी संपर्क साधावा.

### ज्येष्ठ नागरिकाची एक लाखांची फसवणूक

**पनवेल :** एका ६७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकांची ५ हजार रुपयाचा रिफंड एका कंपनीकडून मिळविण्यासाठी ऑनलाईन संकेतस्थळावर भेट देत असताना त्यांची १ लाख १६ हजाराची फसवणूक झाल्याची घटना नवीन पनवेल येथे घडली आहे.घर विक्रीसाठी एका संकेतस्थळावर जाहिरात देण्यासाठी ५ हजार रुपये भरले होते. ती रक्कम परत मिळविण्यसाठी ६७ वर्षीय उत्पलकुमार सामंता हे संकेतस्थळ तपासत असताना त्यांना युवतीचा फोन आला व तिने मोबाईल वरील वेगवेगळे नंबर दाबायला सांगून त्यांच्या बँक खात्यातून १ लाख १६ हजार रुपये इतर खात्यात वळते केले. याबाबत आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाख्ल केली आहे.

### हिराचंद म्हात्रेंना आदर्श शिक्षक पुरस्कार

**उरण :** आमदार संजय केळकर यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद शाखा रायगड तर्फे उरण तालुक्यातील नविन शेवे शाळेचे मुख्याध्यापक हिराचंद म्हात्रे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. हिराचंद म्हात्रे यांनी नविन शेवे शाळेत आपल्या कार्याचा उत्तम ठसा उमटविला आहे.आपल्या उपशिक्षकांना हाताशी धरुन त्यांनी वेगवेगळे उपक्रम हाती घेतले.याच त्यांच्या कार्याचा गौरव शिक्षक परिषदेने केला या वेळी राज्याध्यक्ष राजेश सुर्वे ,कोप्रोली केंद्राचे केंद्र प्रमुख बबन पाटील, शंकर म्हात्रे,वैभव कांबळे,नरेश मोकाशी, निर्भय म्हात्रे, महेंद्र गावंड, म्हात्रे कुटुंबीय उपस्थित होते.

# कामोठ्यात रस्त्याचे काँक्रीटीकरण

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते लोकार्पण




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठ्यातील हावरे ग्रीन पार्क फेस ३ समोरील रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम एमएमआरडीएच्या माध्यमातून करण्यात आले आहे. हे काम पूर्णत्वास नेण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत आणि पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेवका अरुणा भगत यांनी पाठपुरावा केला होता. या रस्त्याचे लोकार्पण मंगळवारी (दि. ७) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेविका अरुणा भगत, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, भाऊ भगत, हर्षवर्धन पाटील, सचिन यमगर, मंगेश म्हात्रे, शेखर मोरे, सुयम वाफारे, अविनाश पाटील, प्रकाश राठोड, राहुल चचर, दीपक घाडगे, अनंत वायकर, शंभु सॅयन आदी उपस्थित होते.



पनवेल : विचुंबे भाजपच्या नववर्ष दिनदर्शिकेचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी प्रकाशन झाले. त्यांनी उपस्थितांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या तसेच भाजप सदस्य नोंदणी अभियानावर भर देऊन जास्तीत जास्त सदस्यांची नोंदणी करावी, असे आवाहन केले. या वेळी विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, माजी सरपंच बळीराम पाटील, माजी उपसरपंच रविंद्र भोईर, सदस्य अनिल भोईर, अनंता गायकवाड, चेतन सुरते, निलेश म्हात्रे, अनुसूचित जाती मोर्चाचे तालुकाध्यक्ष अविनाश गायकवाड, पत्रकार गणेश कोळी, संजय कदम, प्रवीण मोहोकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# उरणमध्ये नऊ महिन्यात एक हजार ७२५ श्वानदंश रुग्णांवर उपचार

**उरण : प्रतिनिधी**

निर्बीजीकरण बंद असल्याने नागरिकांवर हल्ले करणाऱ्या भटक्या आणि मोकाट श्वानाच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. याचा धोका नागरिकांना होऊ लागला असून उरण शहर आणि तालुक्यात महिन्याला सरासरी १५० जणांना या भटक्या श्वानानी चावा घेतला आहे. तर एप्रिल पासून डिसेंबर पर्यंतच्या नऊ महिन्यात एकूण १ हजार ७२५ नागरिकांना चावा घेतला असून त्यांच्यावर उरणच्या शासकीय इंदिरा गांधी रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. उरण शहरासह तालुक्यातील अनेक गावात भटक्या श्वानाच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. येथील कचरा आज घाण असलेल्या ठिकाणी दहा ते बाराच्या संख्येने हे श्वान घोळक्याने भटकंती करीत आहेत.

अनेक ठिकाणी कोंबड्या साफ करून त्याची घाण टाकली जात आहे. या ठिकाणी ही मोठ्या प्रमाणात असे श्वानाची संख्या अधिक आहे. अनेकदा रात्री आणि पहाटेच्या वेळी एकट्याने ये जा करणाऱ्या दुचाकी व सायकल स्वारांवर या भटक्या श्वानाकडून हल्ले केले जात आहेत. त्यामुळे त्यांचा अपघात ही होण्याची शक्यता आहे. यात उरण शहरातील विमला तलाव आणि परिसरात ही मोठ्या प्रमाणात श्वान पहाटे घोळक्याने भटकत आहेत. याची भीती पहाटे मॉर्निंग वॉक साठी येणाऱ्यांना ही धास्ती वाटत आहे.

या स्थितीवर उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. उरण नगर परिषदेने भटक्या श्वानाच्या निर्बीजी करणासाठी नियोजन केल्याची माहिती परिषदेकडून देण्यात आली आहे. मात्र ग्रामपंचायत परिसरात अशी कोणत्याही प्रकारची व्यवस्था उपलब्ध नाही. या बहुतांशी परिसरात सिडको कडून मोकाट श्वानाचे निर्बीजिकरण केले गेले आहे. मात्र हे काम पूर्ववत सुरू करावे अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकांकडून केली जात आहे.

**उरणमधील श्वानाच्या चाव्यात वाढ झाली आहे. मात्र अँटी रेबीज उपचारासाठी उरणच्या इंदिरा गांधी रुग्णालय सदैव तत्पर आहे. रुग्णालयात ५०० पेक्षा अधिक इंजेक्शन कायम उपलब्ध ठेवण्यात आले आहेत.**

**-डॉ. बाळासाहेब काळेल, अधीक्षक**



# क्युआरकोड अपडेटच्या बहाण्याने फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

गुगल-पेचा क्युआर कोड अपडेट करून देण्याच्या बहाण्याने आलेल्या एका भामट्याने पनवेलमधील ६६ वर्षीय व्यावसायिकाच्या मोबाईल फोन मधून गुगल पे चा वापर करत त्याच्या खात्यातील ९५ हजाराची रक्कम आपल्या खात्यात वळती करून फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे.




शहरातील अगरबत्ती विक्रेते मनोहर वाधवानी यांच्या दुकानात एक भामटा आला व त्याने मी गुगले पे मधून आलो असून तुमच्या दुकानातील क्युआर कोड अपडेट करून द्यायचा आहे. तसेच गुगले पे च्या साऊंड बॉक्सच्या कॅश बॉक्सचे काम करून देणार असल्याचे त्याने सांगितले. यासाठी त्याने वाधवानी यांच्याकडून त्यांचा मोबाईल फोनचा लॉक काढून घेवून आपल्या हातात घेतला व वाधवानी यांचे दुर्लक्ष असल्याचे पाहून त्यांच्या मोबाईल मधील गुगल पे च्या मदतीने ९५ हजार रुपयाची रक्कम आपल्या खात्यात वळती करून घेतली व तो निघून गेला. घटनेची वाधवानी यांना माहिती पडताच त्यांनी याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे.

# भागूबाई चांगु ठाकूर विद्यालयात रायझिंग डे

**उरण : रामप्रहर वृत्त**

द्रोणागिरी श्रीम. भागूबाई चांगु ठाकूर विद्यालय येथे मंगळवारी (दि.७) उरण वाहतूक पोलीस व उरण पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने अंतर्गत वाहतूक सुरक्षा व पोलीस रायझिंग डे असे जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमावेळी दहिफळे वाहतुक विभाग वरिष्ठ पोलिस निरीक्षक वरिष्ठ पोलिस निरीक्षक, उरण पोलीस ठाण्याचे एआयपी संजय गोरे, निलेश मोरे, मानसी तांबोळी मॅडम व त्यांचे इतर सहकारी यांची उपस्थिती लाभली. शाळेचे चेयरमन चंद्रकांत घरत व मुख्याध्यापिका अनुराधा काठे मॅडम यांनी मान्यवरांचे स्वागत केले




शालेय गटातील इयत्ता आठवी ते दहावी तील विद्यार्थ्यांना श्री दहिफळे साहेबांनी रस्ता व वाहतूक नियम, कायदे, सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. दुचाकी, चारचाकी वाहने, लायसन्सचे महत्व, गाडी चालवताना पालन करावयाचे नियम याबद्दल जागरूक नागरिक कसा असावा याबद्दल मोलची माहिती देण्यात आली. तसेच संजय गोरे साहेब यांनी शस्त्र ओळख करुन दिली.

यात गन, पिस्तुल चे विविध प्रकार विद्यार्थ्यांना जवळून पाहण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ स्नेहल मॅडम यांनी क़ेले.

# पत्रकारांचा सन्मान हा लोकशाहीचा सन्मान -प्राचार्य आमोद ठक्कर



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

पत्रकार हा समाजाचा मोठा घटक आहे. त्यांचा सन्मान हा लोकशाहीचा सन्मान आहे. असे प्रतिपादन वीर वाजेकर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य आमोद ठक्कर यांनी केले.

मराठी वर्तमान सृष्टीचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या २१३ व्या. जयंती व महाराष्ट्र शासन वाचन पंधरवडा अंतर्गत, फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या सभागृहात मराठी विभाग व ग्रंथपाल विभाग यांच्या वतीने काल ६ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या वेळी पत्रकारांना सन्मानचिन्ह देऊन महाविद्यालयाच्या वतीने गौरविण्यात आले. व्यासपीठावर उरण तालुका दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष जीवन केणी, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप पाटील, जगदीश तांडेल, अजित पाटील, सूर्यकांत म्हात्रे, दत्तात्रेय म्हात्रे, पंकज ठाकूर, दिनेश पवार, राजकुमार भगत, महेश भोईर, सुभाष कडू, मिलिंद खारपाटील, आरती सुरवसे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा. चिंतामण धिंदळे यांनी केले. तर आभार ग्रंथपाल सुप्रिया नवले यांनी व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वृत्तपत्रांचे वाटप करण्यात आले.

# छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील शेडुंग येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ येथील विद्यार्थ्यांना नशामुक्ती नवी मुंबई व सायबर क्राईम या विषयी माहिती वपोनि गजानन घाडगे यांच्या माध्यमातून करण्यात आली.

महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत शेडुंग येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे अधिकारी विकास साळवी यांनी विद्यार्थ्यांना नशेमुळे होणाऱ्या दुष्पपरिणामांची व सायबर गुन्हे कशा प्रकारे घडतात या संदर्भात माहिती दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन झाले.

# लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे आंतरशालेय कराओके गायन स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

शरीर हे संगीत आहे आणि आत्मा हा आवाज आहे,कराओके स्पर्धा ही हौशी गायकांसाठी व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन बाठीया हायस्कूलचे मुख्याध्यापक भगवान माळी यांनी केले. ते लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे आयोजित आंतर शालेय कराओके गायन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. त्यांनी सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या आणि सरगम क्लबचे या स्तुत्य उपक्रमाच्या आयोजनातून नवीन कलाकारांना संधी व आत्मविश्वास मिळतो, असे सांगितले.

सरगम क्लबच्या अध्यक्ष मानदा पंडित यांनी क्लबतर्फे सर्वांचे स्वागत केले आणि स्पर्धकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आभार मानून पुढील महिन्यात खुल्या कराओके



स्पर्धेलासुद्धा प्रतिसाद देण्याचे आवाहन केले.

या स्पर्धांना पनवेल परिसरातील विद्यार्थ्यांकडून खूप प्रतिसाद मिळाला. एकुण ३ गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धे चे विजेतेपद खालील स्पर्धकांनी पटकावले.इ. चौथी पर्यंत प्रथम क्रमांक - कैवल्य लोंढे, द्वितीय क्रमांक प्रांजल ठाकूर तर तृतीय क्रमांक हृतिका जैन इ. ५ वी ते ७ वी प्रथम क्रमांक - कैवल्य पवार, द्वितीय क्रमांक - कृतिका देवळे, तृतीय क्रमांक - आदेश शेडगे आणि इ. ८ वी ते १० वी प्रथम क्रमांक - स्नेहा शेलार द्वितीय क्रमांक - स्वर म्हात्रे तृतीय क्रमांक - जिया फडके. पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी उपस्थित प्रमुख पाहुणे रिजन चेअरमन सुयोग पेंडसे यांनी सर्व विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन केले तसेच सर्व स्पर्धकांनी अतिशय सुंदर गाणी सादर केली असे सांगुन या स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या सीनिअर/ज्युनिअर के जी मधील मुलांचे विशेष कौतुक केले.

या प्रसंगी उपस्थित झोन चेअरमन अलकेश शहा यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्रांतपाल एन आर परमेश्वरन, आणि जी एस टी चेअरमन विजय गणात्रा यांनी उपस्थिती देऊन स्पर्धकांचा उत्साह वाढवला. याप्रसंगी पालकांचे वतीने ऍड. सुरेखा भुजबळ यांनी सरगम क्लबचे या उपक्रमाच्या सुंदर आयोजनाबद्दल आभार मानले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणुन सतीश मोरे आणि महेश ठक्कर यांनी काम पाहिले. दोन्ही परीक्षकांनी स्पर्धकांना मोलाच्या सूचना दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गोडसे यांनी केले. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी स्वाती गोडसे, प्रेमेंद्र बहिरा, धवल शहा, जयेश मणियार, संध्या महानुभाव, ओमकार खेडकर आणि मिलिंद जोशी यांनी मोलाचे सहकार्य केले.

## संपादकीय

# गतिमानतेची सप्तसूत्री

सत्ता ही सामान्य लोकांसाठीच राबवायची असते याचे संपूर्ण भान ठेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारभाराची सूत्रे स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम महाराष्ट्राच्या टोकाला असलेल्या अतिदुर्गम गडचिरोलीचा दौरा काढला. लोकांच्या समस्या भराभर सुटल्या पाहिजेत या विचाराने त्यांनी आता तातडीची पावले उचलली आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंगळवारी राज्यातील जिल्हाधिकारी, आयुक्त, विभागीय अधिकारी आणि पोलिस आयुक्त व अधीक्षकांची ऑनलाइन बैठक घेऊन गतिमान प्रशासनासाठी सात कलमी कार्यक्रम जाहीर केला.

**महाराष्ट्राचा कारभार किती गतिमान होऊ शकतो याची चुणूक गेल्या दोन–अडीच वर्षांत जनतेला मिळाली आहे. शिंदे–फडणवीस सरकारच्या कार्यकाळात राज्यात अनेक विकासकामे फलद्रुप झाली. समृद्धी महामार्ग, कोस्टल रोड, अटलसेतु, मेट्रो प्रकल्प आणि असंख्य कामांची यशस्वीरित्या लोकार्पणे झाली. परंतु मोठमोठाले प्रकल्प किंवा बांधकामे म्हणजे विकास नव्हे. विकासाची फळे सामान्य जनतेच्या पदरातही पडली पाहिजेत किंबहुना समाजातील शेवटच्या दुर्बल घटकापर्यंत विकासाची गंगा पोहोचली पाहिजे असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे धोरण राहिले आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत शिंदे–फडणवीस सरकारने अनेक समाजकल्याणकारी योजना राबवल्या. जगभर गाजावाजा झालेली लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक. या योजनेवर यथेच्छ तोंडसुख घेणारे विरोधक आपापल्या राज्यातदेखील याच योजनेची नक्कल करू लागले आहेत. किंवा निवडणूक जाहिरनाम्यात अशाच योजनांच्या रेवड्या जाहीर करत आहेत. आता मुख्यमंत्री फडणवीस यांनी येत्या शंभर दिवसांत राज्यातील सरकारी कारभार सुधारण्याचा चंग बांधला आहे असे दिसते. या कामात त्यांना यश आले तर महाराष्ट्राचे नागरिक त्यांना नक्कीच दुवा देतील. सरकारी काम म्हणजे सहा महिने थांब अशी आपल्याकडे पूर्वापार म्हण आहे. सरकारी कारभाराला पाण्यात बसलेल्या म्हशीची उपमा देखील दिली जाते. सरकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर उमटलेले हे मोठे प्रश्नचिन्ह कसे घालवायचे हीच एक समस्या होती, पण मुख्यमंत्र्यांनी विशद केलेली सात कलमे सरकारी ढिलाईच्या या प्रश्नाला थेट हात घालणारी आहेत. विभागीय कार्यालयांचे संकेतस्थळ ताबडतोब अद्ययावत करण्याचे आदेश त्यांनी काढले आहेत. याचबरोबर सरकारी कामकाजाची माहिती आणि विभागीय अधिकाऱ्यांच्या भेटींच्या तारखा नागरिकांसाठी वेळोवेळी जाहीर कराव्यात असेही त्यांनी म्हटले आहे. अनेक प्रलंबित प्रकरणांचा निपटारा येत्या शंभर दिवसांत मार्गी लावण्याचे आव्हानात्मक काम त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांवर टाकले आहे. माहिती अधिकारात वारंवार मागणी केली जाते अशी माहिती अगोदरच संकेत स्थळांवर जाहीर करण्यात यावी अशा सक्तसूचना त्यांनी दिल्या आहेत. सरकारी कार्यालयांमध्ये अनेकदा उद्योजकांना फेऱ्या माराव्या लागतात. उद्योजक हे अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असल्याने त्यांचा वेळ वाया जाईल अशी दिरंगाई करू नये अशीही सूचना मुख्यमंत्र्यांनी केली आहे. विभागीय कार्यालयांमध्ये नागरिकांची गर्दी तर नेहमीच असते, पण त्यांना कुठल्याही सोयीसुविधा उपलब्ध नसतात. अनेक ठिकाणी स्वच्छतागृहांची अवस्था तर संतापजनक असते. हे चित्र ताबडतोब बदलायला हवे असे आदेश देण्यात आले असून सरकारी कार्यालयांच्या परिसरात काटेकोर स्वच्छता राखण्यात यावी. तसेच खटारा झालेली सरकारी वाहने तातडीने निर्लेखित केली जावीत असा हा सातकलमी कार्यक्रम आहे. विशेष म्हणजे हे सारे काम शंभर दिवसांत उरकायचे असून पंधरा एप्रिल रोजी कामाचा आढावा घेतला जाईल असे स्पष्ट करण्यात आले आहे. गतिमान कारभाराची ही सप्तसूत्री स्वागतार्ह म्हणायला हवी.**

# ..म्हणून साजरा होतो प्रवासी भारतीय दिन

भारतामध्ये मोठ्या संख्येने लोक शिक्षणासाठी तसेच नोकरी व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी जगातील विविध देशांमध्ये गेलेले आहे. त्यातील बरेच भारतीय तिथेच स्थायिक झालेले आहेत. या भारतीयांनी या देशांमध्ये राहताना आपली प्रगती करून घेतलीच, पण त्याचसोबत ते राहत असलेल्या देशांच्या विकासामध्ये मौलिक योगदान दिले आहे. अशा जगभरात पसरलेल्या अनिवासी भारतीयांना आपला मूळ देश असलेल्या भारताशी जोडून घेण्यासाठी एक नवा विचार पुढे आला. त्यातूनच प्रवासी भारतीय दिन या संकल्पनेचा जन्म झाला.

भारत सरकारकडून दरवर्षी ९ जानेवारी हा दिवस प्रवासी भारतीय दिन म्हणून साजरा केला जातो. पहिला प्रवासी भारतीय दिवस ९ ते ११ जानेवारी या कालावधीत २००३ साली साजरा करण्यात आला होता. भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कल्पनेतून या दिवसाची सुरूवात करण्यात आली. आपल्या देशातून अन्य देशात गेलेल्या भारतीय लोकांनी आपल्या मूळ भूमीशी आणि संस्कृतीशी जोडले जावे, त्यांच्याशी असलेले संबंध अधिक दृढ व्हावेत, हा या मागील हेतू होता.



प्रवासी भारतीय दिनी विदेशात राहून विविध क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या भारतीयांना प्रवासी भारतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. विदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांच्या मनात भारताविषयी काय भावना आहे. जगातील अन्य देशांच्या तुलनेत भारताने आणखी काय करायला हवे, भारत आणि इतर देश यांच्यामध्ये काय समान धागे आहेत, अशा अनेक गोष्टींचे वैचारिक आदान प्रदान व्हावे, त्यासाठी हे प्रवासी दिन हे व्यासपीठ आहे. यामध्ये विशेषत: तरुण वर्गाला अनिवासी भारतीयांकडून मार्गदर्शन केले जाते. विदेशातील नव्या संधींबद्दल यांना माहिती मिळते. अनिवासी भारतायींच्या माध्यमातून भारतात नवी व्यावसायिक गुंतवणूक आकर्षित करण्याचाही प्रयत्न केला जातो.


प्रवासी भारतीय दिन सुरू करण्याचे श्रेय लक्ष्मीमल सिंघवी समितीला जाते. भारत सरकारकडून प्रवासी भारतीय पुरस्कार दिला जातो. विदेशात उत्तम कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते दिला जातो. भारतीय लोक विदेशात मोठ्या संख्येने स्थायिक होत आहेत. आता जग हे आधुनिक वाहतूक आणि दूरसंपर्क यंत्रणांनी जोडले गेले आहे. असे असतानाच भारतात अजून बर्याच पायाभूत सुविधांची गरज आहे. भारत खेड्यांचा देश आहे. मोठ्या प्रमाणात लोकसंख्या ही खेडोपाडी वसलेली आहे. त्या सगळ्यांपर्यंत अजून बर्याच पायाभूत सुविधा पोहचण्याची गरज आहे.

भारताचे पंतप्रधान जेव्हा विदेशी दौऱ्यावर जातात, तेव्हा तेथील भारतीयांना भेटत असतात. नरेंद्र मोदी जेव्हा भारताचे पंतप्रधान झाले तेव्हा अनिवासी भारतीय आणि भारत यांच्यामध्ये जास्तीत जास्त संबंध येण्यासाठी तसेच विदेशातील भारतीयांना भारताशी जोडण्यासाठी मोठा प्रयत्न करण्यात आला. त्यातून हाऊडी मोदी यासारख्या मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यातून मोदींनी अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांना प्रभावीत केले होते. मोदींना पंतप्रधान झाल्यानंतर जगातील अनेक देशांचे दौरे केले. त्यांनी तिथे राहणार्या भारतीयांचे मोठे मेळावे घेतले. त्यात त्यांना मोठा प्रतिसाद मिळतो.

**(साभार : माय महानगर)**

# पर्यटकांचे आकर्षण तळागड किल्ला

रोहा रेल्वे स्टेशनपासून २१ किमी व मुंबई–गोवा महामार्गापासून १५ किमी अंतरावर तसेच मुरुडपासून ४५ किमी अंतरावर तळागड किल्ला वसलेला आहे. हा ऐतिहासिक किल्ला कोणी बांधला याची माहिती उपलब्ध नाही, पण इ.स.१६व्या शतकात निजामपूरच्या आदिलशहाने हा किल्ला बांधून पूर्ण केला असे दफ्तर आहे व तो इ.स.१६४८पर्यंत त्यांच्याच ताब्यात होता. १६४८मध्ये हा किल्ला शिवाजी महाराजांनी जिंकला व तो शेवटपर्यंत आपल्या ताब्यात ठेवला. जंजिराच्या सिद्धीने हा अनेकदा हा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला. व किल्ल्यासाठी वेढाही घातला होता. शिवाजी महाराज हयात असे पर्यंत हा किल्ला कोणीही जिंकू शकला नाही. पण शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर हा किल्ला जंजिराच्या सिद्धीने ताब्यात घेतला. असे म्हणतात कि,शिवाजी महाराजांनी राज्यभिषेखच्यावेळी जी वस्त्रे परिधान केली होती ती या किल्ल्यावरून नेली होते.



तळागडाची उंची समुद्र सपाटीपासून एक हजार फूट आहे. हा किल्ला तटबंदीने संरक्षक आहे. या किल्ल्याचा मुख हेतु शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी केला जात असे. विशेषतः जंजिराच्या सिद्धीच्या सैन्यावर बारकाईने लक्ष ठेवला जात असे. सभौताली सागरी बंदर असल्याने या बंदरावरसुद्धा या किल्ल्याच्या माध्यमातून लक्ष ठेवला जात असे. या किल्ल्यावरून घोसाळगड किल्ला स्पष्टपणे दिसतो. किल्ल्यावर जाण्यासाठी तळा शहराच्या मध्यभागातून रस्ता जातो तो सरळ गडाच्या मुख्य प्रवेश द्वारापाशी पोहचतो. हे अंतर साधारण ४५ मिनिट ते एक तासाचा आहे. गडावर जाण्याचा रस्ता सोपा व सुरक्षित आहे. पण हिंस्त्र प्राण्यांच्या मुळे किल्ल्यावर रात्री कोणी राहण्यास जात नाही. व तशी राहण्याची सोय नाही.

तळा शहरात उन्हाळ्यामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष असते. परुंतु एक हजार फूट उंचहीवरील किल्ल्यामध्ये १२ माही गोडे पाणी भरलेले असते. सातवहन काळामध्ये कुडा व मांदाड हि मोठी बंदरे होती. बंदरावर आलेला माल घाटावर पोहचण्यासाठी कुडा भोरघाट पैठण असा व्यापारी मार्ग होता. व या रस्त्याच्या रक्षणासाठी तळागड किल्ला २००० वर्षांपूर्वी सातवहन लोकांनी बांधला असे म्हटले जाते. तळगड किल्ला हा आकारमानानी लहान आहे. यामुळे त्याचा घेरा पण लहान आहे. याची वैशिष्टे म्हणजे किल्ल्याची तटबंदी अजून सुरक्षित आहे. बुरुज चांगल्या सांगितल्या स्थितीत आहेत परंतु तळागडाच्या पायथ्याशी असणाऱ्या वाड्या यांच्यावर बुरुजाचे दगड कोसळून वित्त हानी झाल्याचे समजते. त्यासाठी सरकारने योग्य पाऊले उचलून होणारी दगडांची पडझर थांबवावी अशी विनंती गाववाले करताना दिसतात. गडावर अनेक ठिकाणी घरांचे व वाड्यांचे अवशेष आढळतात. गडाच्या उंच माथ्यावर कातळात सात पाण्याच्या टाक्या आहेत. या किल्ल्यावरून कुडा लेण्यांचा डोंगर, मांदाडची खाडी, घोसाळगड व इंदापूर, तळा हा परिसर स्पष्ट दिसतो. किल्ल्यावर राहण्याची सुविधा नाही. त्यामुळे पर्यटकांना तळा शहरातच राहावे लागते. हा तळागड किल्ला पर्यटकांसाठी एक आकर्षणच आहे.

**–सलीम शेख,** माणगाव

## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्ट फोन चार्ज करताना 'या' पाच चुका टाळा

आजच्या काळात स्मार्टफोनशिवाय कुठलेही काम करणे अवघड झाले आहे. आज मोबाईल बहुतांश कामांमध्ये वापरला जातो. मात्र कालांतराने त्याची बॅटरी खराब होते. बहुतांश स्मार्टफोन्समध्ये Li-Ion (Lithium Ion) बॅटरी वापरल्या जातात. या बॅटरीज साधारणपणे ३०० ते ५०० चार्ज अथवा डिस्चार्ज सायकलसह येतात.



यानंतर बॅटरीची लाईफ कमी होण्यास सुरुवात होते. याच बरोबर त्यांची कॅपॅसिटीही कमी होऊ लागते. अर्थात फुल चार्ज झाल्यानंतरही बॅटरी पूर्णपणे काम करणार नाही. यासंदर्भात, बॅटरी चार्ज करताना कोणत्या चूक करू नये, हे आम्ही आपल्याला सांगत आहोत.

**नेहमी–नेहमी बॅटरी चार्जिंग अलर्टची वाट पाहू नका –** अनेक युजर्स फोनकडून अलर्ट मिळाल्यानंतरच बॅटरी चार्चसाठी लावतात. पण नेहमीच बॅटरीचे चार्जींग संपण्याची वाट पाहू नका. फोनकडून अलर्ट मिळण्यापूर्वीच फोन चार्जला लावा. फोन एकाच वेळी पूर्ण चार्ज होण्यापूर्वीही पॉवर प्लगपासून डिस्कनेक्ट केला जाऊ शकतो.

**ऑफिशियल चार्जरचाच वापर करा –** मोबाईल चार्ज करताना मोबाईलसोबत येणाऱ्या ऑफिशियल चार्जरचाच वापर करायला हवा. मात्र, ओरिजनल चार्जर नसेल तर, कंपॅटेबल चार्जरचा वापर केला जाऊ शकतो. मात्र, सातत्याने दुसरे चार्चर वापरल्यास आपल्या फोनची बॅटरी खराब होऊ शकते.

**सॉकेटमधून चार्जर काढत जा –** बॅटरी फुल चार्ज झाल्यानंतर, नवे स्मार्टफोन चार्ज होणे बंद होते. मात्र, याचा अर्थ चार्जरही काम करणे बंद करते असे नाही. याच बरोबर मोबाईल चार्ज करताना मोबाईल फोनचा वापर करू नका. यामुळे बॅटरी चार्ज होण्यास उशीर लागतो. डिव्हाईसच्या बॅटरीवर याचा परिणाम होतो.

**बॅटरी चार्ज करताना फोनचा वापर करू नका –** मोबाईल फोन चार्ज करताना वापरू नका. महत्वाचे म्हणजे मोबाईल चार्ज करताना त्यावर गेम खेळू नका अथवा व्हिडिओही बघू नका. यामुळे बॅटरी फुल कॅपिसिटीने चार्ज होत नाही. याचा परिणाम बॅटरीच्या लाईफवरही होतो.

**यामुळेही डॅमेज होते बॅटरी –** टेम्परेचरचाही बॅटरीवर मोठा परिणाम होत असतो. हाय टेम्परेचरमुळे बॅटरीवर अधिक स्ट्रेस येतो. यामुळे तिची कॅपेसिटी लवकर कमी होते. यामुळे आपला फोन अधिक गरम असलेल्या रूममध्ये चार्जला लावू नका.

# थोर गणितज्ञ सी.पी. रामानुजम

## निमित्त



भारतीय थोर गणितज्ञ ज्यांनी संख्या सिद्धांत व बीजगणितीय भूमिती या क्षेत्रात सतीश अतिशय मोलाचे काम करणारे सी.पी. रामानुजम उर्फ चक्रवर्ती पद्मनाभन रामानुजम यांचा जन्म ९ जानेवारी १९३८ रोजी मद्रास, मद्रास प्रेसिडेन्सी, ब्रिटिश भारत येथे झाला होता.

चक्रवर्ती पद्मनाभन रामानुजम यांचा जन्म एका तामिळ कुटुंबातील चक्रवर्ती श्रीनिवास पद्मनाभन यांच्या घरात झाला. त्यांचे शालेय प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कुंभकोणम येथील टाउन हायर सेकेंडरी स्कूलमध्ये पूर्ण झाले. त्यानंतर त्यांनी १९५२ मध्ये लोयोला कॉलेज मद्रास या ठिकाणी पदवी पर्यंत शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला.

शालेय जीवनापासूनच त्यांना गणित या विषयात खूप रुची होती त्यामुळे महाविद्यालयात सुद्धा गणितामध्ये त्यांना प्राविण्य मिळवायचे होते. त्यामुळे महाविद्यालयात शिकत असताना खूप जोमाने आणि उत्कंठेने गणित शिकण्याचा त्यांनी प्रयत्न केला व ते अतिशय सोप्या पद्धतीने गणित शिकत असत व त्यात त्यांनी तसे प्राविण्यही मिळवले. लोयोला कॉलेज मध्ये शेवटच्या ऑनर्स वर्षांमध्ये त्यांना फादर चार्ल्स रेसीन या शिक्षकांनी गणित अतिशय प्रभावीपणे शिकवले व त्यात त्यांनी प्राविण्यही मिळाले.

रामानुजम वयाच्या अठराव्या वर्षी गणिताचा अभ्यास करण्यासाठी मुंबईला दाखल झाले. रामानुजम आणि त्यांचे शाळेतील वर्गमित्र राघवन नरसिम्हन व एस. रामनन १९५७ मध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च मध्ये एकत्र आले होते. बॉम्बेतील टाटा इन्स्टिट्यूटमध्ये जगातून प्रथम क्रमांकाच्या गणितज्ञांना भेट देण्याचा एक मानस होता. त्याठिकाणी काही पदवीधर विद्यार्थ्यांनी व्याख्यानांच्या आणि अभ्यासक्रमाच्या नोट्स लिहिण्याची परंपरा असे. त्यानुसार रामानुजम यांनी पहिल्याच वर्षी एका व्हेरिएबलच्या बीजगणितीय फंक्शन्सवर गणींझ मॅक्स ड्युरिंगच्या व्याख्यानांच्या नोट्स लिहिल्या होत्या. हा एक पहिला प्रयत्न केला होता. त्यांनी लिहिलेल्या नोट्स स्पष्टपणे तयार केल्या आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.

विषयाच्या सखोल ज्ञानामुळे तो कठीण उपाय सोप्या आणि मोहक होण्यासाठी कमी करू शकतो, रामनन म्हणतात. मॅक्स ड्युरिंगच्या व्याख्यानांमुळे त्यांना बीजगणितीय संख्या सिद्धांताची गोडी लागली. त्यांनी केवळ बीजगणितीय भूमिती आणि विश्लेषणात्मक संख्या सिद्धांताचा अभ्यास केला नाही, ज्याचे त्यांनी सखोल ज्ञान प्रदर्शित केले परंतु ते इतर अनेक संबंधित विषयांमध्येही तज्ञ बनले.

रामानुजम यांचे डॉक्टरेट सल्लागार केजी रामनाथन यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी जर्मन संख्या सिद्धांतकार कार्ल लुडविग सिगेल यांच्या संशोधन कार्याशी संबंधित समस्येवर संशोधनकार्य करण्यास सुरुवात केली. त्यांनी १९६६ मध्ये आपला गणितीय संशोधन कार्याचा प्रबंध लिहिण्यास सुरुवात केली. पुढील वर्षी १९६७ मध्ये त्यांची डॉक्टरेट साठी लागणारी परीक्षा दिली. त्यांच्या परीक्षकांपैकी एक डॉ. सिगेल हे होते, रामानुजम या तरुणाच्या ज्ञानाची खोली आणि त्याच्या उत्कृष्ट गणितीय क्षमतेने ते खूपच प्रभावित झाले होते. त्यांच्या वैयक्तिक लायब्रीत काही गैर–इंग्रजी गणिती पुस्तके आहेत.

**सन्मान व पुरस्कार**

१९७३मध्ये त्यांची इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसचे फेलो म्हणून निवड झाली. रामानुजमच्या मृत्यूनंतर जेनोवा विद्यापीठाच्या पूर्वीच्या इस्टिट्यूटो डी मॅटेमॅटिका (गणितशास्त्र संस्था)मध्ये त्यांच्या नावावर स्मारक हॉलचे नाव देण्यात आले . **(साभार : इंटरनेट)**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात 'या' पदार्थांमुळे वाढू शकते कोलेस्ट्रॉल

हिवाळा सुरू झाला की आजारांचा धोकाही वाढतो. ज्यांची प्रतिकारशक्ती कमकुवत आहे त्यांना सर्दी, ताप, खोकला यासारख्या विषाणूजन्य संसर्गाचा त्रास सहन करावा लागतो. ज्या लोकांना कोलेस्ट्रॉलची समस्या आहे, त्यांनी हिवाळ्यात आरोग्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.निरोगी राहण्यासाठी आपल्या शरीरात चांगले कोलेस्ट्रॉल असणेही गरजेचे आहे. परंतु शरीरातील वाईट कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढल्याने आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. विशेषतः, या स्थितीत हृदयाला सर्वात जास्त धोका असतो.



हिवाळा सुरू झाला की आजारांचा धोकाही वाढतो. ज्यांची प्रतिकारशक्ती कमकुवत आहे त्यांना सर्दी, ताप, खोकला यासारख्या विषाणूजन्य संसर्गाचा त्रास सहन करावा लागतो. ज्या लोकांना कोलेस्ट्रॉलची समस्या आहे, त्यांनी हिवाळ्यात आरोग्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.निरोगी राहण्यासाठी आपल्या शरीरात चांगले कोलेस्ट्रॉल असणेही गरजेचे आहे. परंतु शरीरातील वाईट कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढल्याने आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. विशेषतः, या स्थितीत हृदयाला सर्वात जास्त धोका असतो.

गोड पदार्थांपासून लांब रहा – जर तुम्ही खूप गोड खात असाल तर कोलेस्ट्रॉलची समस्या जाणवू शकते. थंडीच्या मोसमात लोकांना गाजराचा हलवा, मिठाई किंवा तिळाचे लाडू खायला आवडतात, पण ते जास्त प्रमाणात खाल्ल्याने खराब कोलेस्ट्रॉलची समस्या निर्माण होते.

फास्ट फूड – फास्ट फूडची क्रेझ शहरांबरोबरच गावातील लोकांमध्येही वाढताना दिसत आहे. पण ते खायला जेवढे चविष्ट असते, आरोग्यासाठी तेवढेच घातक असते. फास्ट फूडमुळे शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल वाढते, जे हृदयासाठी खूप धोकादायक आहे.

सिगारेट आणि दारू – हिवाळ्यात कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी दारू, सिगारेट यांसारख्या सवयींपासून दूर राहिले पाहिजे. सिगारेट आणि मद्यामुळे आरोग्य तर बिघडतेच पण कोलेस्ट्रॉलही वाढते.

(या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)

# श्रीवर्धन नगर परिषदेची तोडक कारवाई

## अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले

**श्रीवर्धन : बातमीदार**

अनधिकृत हॉटेल बांधत असल्याचे निदर्शनास आल्यावर सदर जागा मालकाला नोटीस बजावल्यानंतरदेखील कोणत्याही प्रकारे नोटीसीला उत्तर न दिल्यामुळे श्रीवर्धन नगर परिषदेने सदर अनधिकृत बांधकामावरती तोडक कारवाई केली आहे.

श्रीवर्धन शहरातील चौकर पाखाडी परिसरामध्ये पुणे येथील एका धनदांडग्याने जागा खरेदी केली होती. या व्यक्तीने सदर जागेमध्ये नगरपरिषदेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता आरसीसीचे अनधिकृत जोते बांधले होते. सदरचे अनधिकृत बांधकाम हे काढून टाकावे अशा प्रकारची नोटीस श्रीवर्धन नगर परिषदेने संबंधित बांधकाम करणाऱ्या व्यक्तीला बजावली होती. अनधिकृत बांधकाम करणारी अमित औरंगाबादकर ही व्यक्ती नाताळ ते ३१ डिसेंबर या सुट्टीचा फायदा घेऊन या ठिकाणी पुढील बांधकाम करण्यासाठी सेंट्रिंग ठोकत असल्याचे नगरपरिषदेच्या निदर्शनास आले.



श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यासाठी नगरपरिषदेकडून पूर्वपरवानगी घ्यावी लागते. त्याचप्रमाणे नगर रचना विभागाकडून देखील ना हरकत दाखला घ्यावा लागतो. सदर व्यक्ती जवळजवळ ३००० स्क्वेअर फुट बांधकाम त्या ठिकाणी करत असल्याचे नगरपरिषदेच्या निदर्शनास आले होते. त्या ठिकाणी सदर व्यक्ती पर्यटकांसाठी हॉटेल बांधत असल्याचे निदर्शनास आल्याकारणाने व सदर जागा मालकाला नोटीस बजावल्यानंतर देखील कोणत्याही प्रकारे नोटीसीला उत्तर न दिल्यामुळे श्रीवर्धन नगर परिषदेने सदर अनधिकृत बांधकामावरती जेसीबी लावून उभे करण्यात आलेले सेंट्रींग तसेच जोते जमीनदोस्त केले आहे. या कारवाईमुळे श्रीवर्धन शहरामध्ये अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणल्याचे पाहायला मिळत आहे. श्रीवर्धनचे मुख्याधिकारी विराज लबडे यांनी सदर कारवाई अत्यंत कार्य तत्परतेने केल्यामुळे नागरिकांमधून देखील समाधान व्यक्त होत आहे.

**श्रीवर्धन नगर परिषद हद्दीत अशा प्रकारे कोणीही व्यक्ती अनधिकृत बांधकाम करण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्या व्यक्तीवर फौजदारी कारवाई तसेच तोडक कारवाई करण्यात येईल.**
**– विराज लबडे, मुख्याधिकारी तथा प्रशासक, श्रीवर्धन नगर परिषद.**

# रस्त्याच्या बाजूला खोदलेल्या खड्ड्यात पडून दुचाकीस्वार किरकोळ जखमी

**कर्जत : प्रतिनिधी**

कळंब – नेरळ – माथेरान राज्य मार्ग रस्त्याच्या बाजूला असलेल्या साईडपट्ट्या खोदून त्यात केबल टाकल्या जात आहेत. या केबलसाठी बेकायदा रस्ते खोदले जात असून रात्री एक दुचाकीस्वार त्या खड्ड्यात आपल्या गाडीसह कोसळला. त्यात तो किरकोळ जखमी झाला. सार्वजनिक बांधकाम विभाग अशा खोदकाम करणाऱ्यांवर कारवाई करणार आहे काय? असा प्रश्न दुचाकीस्वाराने उपस्थित केला आहे.



नेरळ – कळंब राज्य मार्गांवरील वरई ते पोही दरम्यान रस्त्याच्या बाजूला एका खाजगी कंपनीचे लाईन टाकण्याचे काम सुरु आहे. या रस्त्याच्या बाजूला साईड पट्टी खोदून त्यात लाईन टाकण्याचे काम सुरु आहे. मात्र हे काम करत असताना संबंधित ठेकेदाराने कोणतीच खबरदारी घेतली गेली नाही. काम सुरु असताना कोणत्याही प्रकारचे सूचना फलक लावलेले नाहीत. तसेच हे काम करत असताना खड्डे खोदून माती दगड पूर्ण रस्त्यावर आले आहेत. यामुळे वाहन चालकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो आहे.

या रस्त्यावर दिवसभर वाहनांची खूप वर्दळ असते. कळंब, वारे ओलमन परिसरातील नागरिक या मार्गांवरून प्रवास करत असतात. मंगळवारी रात्री आठ च्या सुमारास बोरगाव गावातील युवक सतीश पाटील हा दुचाकी वरून घरी परत असताना पोशीर गावाच्या. समोरून येणाऱ्या वाहन अंगावर आणल्याने सतीश पाटील यांनी आपली गाडी बाजूला घेतली असता कडेला खोदून ठेवलेल्या खड्यात गाडी कोसळून अपघात झाला आपला जीव वाचवला. तरी किरकोळ दुखापत झाली आहे.

संबंधित ठेकेदाराच्या हलगर्जी पणामुळे अपघात होउन एखाद्याचा जीव जाऊ शकतो. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी सतीश पाटील यांनी केली आहे.

# पोलीस रेझिंग डेनिमित्त विद्यार्थ्यांची खालापूर पोलीस ठाण्याला भेट

**चौक : प्रतिनिधी**

पोलीस रेझिंग डे निमित्त तालुका हद्दीतील शाळेच्या विद्यार्थ्यांनी खालापूर पोलीस ठाण्याला भेट देऊन प्रत्यक्ष कामकाजाची माहिती घेतली.

भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी २ जानेवारी १९६१ रोजी महाराष्ट्र पोलीस यांना ध्वज सुपुर्त केला होता, त्या दिवसापासून महाराष्ट्रात पोलीस रेझिंग डे साजरा केला जातो. प्रत्यक्षात चित्रपट,टीव्ही मालिका, सोशल मीडियावर दाखविण्यात येत असलेले पोलिसांच्या कामकाजाचे चित्र, सामान्य जनतेशी संपर्क, पोलीस करत असलेले काम,कर्तव्य जसे दाखवले जात असते, तसे ते नसते,त्यामुळे प्रत्यक्ष पोलीस ठाण्यात जे कामकाज कसे चालते, त्याची वस्तुस्थिती काय आहे, हे कामकाज कसे चालते याची प्रत्यक्ष भेट घेऊन कामकाज दाखविले जाते.



खालापूरचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी पोलिसांच्या कामकाजाची प्रत्यक्ष माहिती व्हावी म्हणून तालुका हद्दीतील शाळेच्या विद्यार्थ्यांना खालापूर पोलीस ठाण्यात बोलावुन प्रत्यक्ष कामकाजाची व शस्त्रांची माहितीही देण्यात आली.

# रसायनी पोलिसांकडून रेझिंग डेनिमित्त पथनाट्य

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलिस स्थापना दिन म्हणून रसायनी पोलिस ठाण्याच्या हद्दीत वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम साजरे करुन पोलीस स्थापना सप्ताह (रेझिंग डे)मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने मोहोपाडा मुख्य बाजारपेठेतील शिवाजी चौकात महर्षी दयानंद महाविद्यालय कला, वाणिज्य आणि विज्ञान परेल मुंबई या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोहोपाडा येथे नशामुक्ती याविषयावर पथनाटय सादर केले तसेच जनजागृतीही केली.



उपक्रमांमध्ये गावाची स्वच्छता, गावात पथनाट्यांद्वारे जनजागृती गावकऱ्यांसाठी रात्रीचे सत्र सत्रांमध्ये समाज प्रबोधनाचे काम तसेच गावकऱ्यांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन आदी उपक्रम पार पडले.या पथनाटचातून नशामुक्तीवर समाजप्रबोधन करण्यात आले.यावेळी पथनाट्य पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी दिसून आली,त्यांनी नशा मुक्तीची सध्या गरज का आहे,यावरील होणारी जनजागृती समजावून घेतली.

यावेळी रसायनी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय बांगर,गोपनीय राहूल भडाले,वाहतूक शाखेचे नामदेव डोके ,वाहतूक पोलिस सुरेश पाटील, निलेश गडाग,पिंगळे,राजेश वळवी,चावरे यांच्यासह महर्षी दयानंद महाविदयालयाच्या एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा कवल वर्मा आणि सचिव सोनिया गांधी, डॉ. हेमंत शर्मा (प्राचार्य) एन.एस. एस कार्यक्रम अधिकारी सहा. प्रा. शुभदा गाला, डॉ. प्रमोद टोहके, सचिन नरळे ,सुजित पाटील आदी उपस्थित होते.

# आमदार शेखर निकम यांनी घेतले गोडसई दर्गाचे सहकुटुंब दर्शन



**नागोठणे : बातमीदार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजितदादा पवार गट) चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदार संघांचे आमदार शेखर निकम यांची नागोठणे जवळील गोडसई (वाकण) येथील हजरत सय्यद बालेपीर शहा बाबा दर्गावर नितांत श्रद्धा असून दर्गाचे तत्कालीन मुजावर मरहूम लियाकतबाबा मांडलेकर यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्यानंतर आमदार शेखर निकम हे आपली धर्मपत्नी पुजा निकम व मुलगी मुक्ता निकम यांच्या समवेत मंगळवार दि. ७ जानेवारी रोजी सकाळी ९. ३० वाजता गोडसई येथे आले व त्यांनी हजरत सय्यद बालेपीर शहा बाबा दर्गावर चादर चढवून दर्शन घेतले. दरम्यान दर्शन झाल्यानंतर आमदार शेखर निकम व कुटुंबियांचे मरहूम लियाकतबाबा मांडलेकर यांचे सुपुत्र अलिम मांडलेकर यांनी आमदार शेखर निकम व कुटुंबियांचे स्वागत केले.

यावेळी अलिम मांडलेकर यांच्या समवेत पप्पूशेठ अधिकारी, ईर्शाद मुजावर, उमेर सांगडे, सलीम मोडक, पाटील सर आदी उपस्थित होते. दरम्यान गोडसई येथील दर्गाचा उर्से शनिवार दि. १५ व रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी संपन्न होणार असल्याची माहिती अलिम मांडलेकर यांनी आमदार शेखर निकम यांना दिली.

# डॉ. सुभाष म्हात्रे कुलाबा जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**मुरुड : प्रतिनिधी**

भाई जगताप मित्र मंडळ, आमदार मधुशेठ ठाकुर ट्रस्ट व राजा शिवछत्रपती व ए.पी. जे.अब्दुल कलाम मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक,कला,क्रिडा, पत्रकार व वैद्यकीय या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार दिला जातो.

यंदाचा पुरस्कार मुरुड वसंतराव नाईक महाविद्यालयाचे डॉ.सुभाष म्हात्रे यांना मिळाला असुन त्यांना सातीर्जे अलिबाग येथील प्रांगणात आमदार भाई जगताप यांच्या हस्ते शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ व कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार २०२५सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# कर्जत येथे दर्पण दिनानिमित्त पत्रकारांची आरोग्य तपासणी

## आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**नेरळ : प्रतिनिधी**

आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनाचे औचित्य साधून भिवपुरी येथील रायगड हॉस्पिटलच्या वतीने कर्जत तालुक्यातील पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला मेडिकल कॉलेजचे डीन विनायक सबनीस यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले

यावेळी व्यासपीठावर कॉलेजचे सी ई ओ कुशाग्र पटेल,महेश काशीद, अॅड रमाकांत तरे, रायगड प्रेस क्लब उपाध्यक्ष संजय मोहिते,कर्जत प्रेस क्लब अध्यक्ष अॅड्. राहुल देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.मेडिकल कॉलेजचे डिन विनायक सबनीस यांनी लोकशाहीचं चौथा स्तंभ असलेला पत्रकार हा दिवस रात्र आपले कर्तव्य पार पाडत असतो.ह्या धावपळीत आपल्या आरोग्याकडे नेहमी दुर्लक्ष होत असते.त्यांचे आरोग्य उत्तम राहावे.या उद्दात हेतूने हे आरोग्य शिबिर भरविण्यात आल्याचे सांगितले.

पत्रकारांची आरोग्य तपासणी रायगड हॉस्पिटल मध्ये करण्यात आली.या आरोग्य शिबिरात रक्त तपासणी, ई सी जी, एक्सरे , नेत्र तपासणी ,सोनोग्राफी, फिजिओ थेरेपी अशा विविध तापसण्या करण्यात आल्या.यावेळी रायगड हॉस्पिटल मधील सर्व डॉक्टरांनी विशेष सहकार्य केले.यावेळी कर्जत प्रेस क्लबने मानपत्र आणि तुळशीची रोप देऊन डॉक्टरांचा सन्मान केला.



### शंकरा आय हॉस्पिटल व विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे

# मोफत नेत्र शिबिरात ९० रुग्णांची तपासणी, ४१ रुग्णांवर शस्त्रक्रिया

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगावचे प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार (दि. ८) रोजी झालेल्या मोफत नेत्र शिबिरात ९० रुग्णांची तपासणी,४१ रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांच्या बाजूला असणाऱ्या महेंद्र पितांबर मेथा यांच्या हॉलमध्ये सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत नेत्र शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ९० रुग्णांची तपासणी करून ४१ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सदरचे शिबीर हे दर महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी होत असते.



दोन वर्षांहुन अधिक काळापासून ३२ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आतापर्यंत २७७५ हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत.

गोरगरीब जनतेला दृष्टी मिळाल्याचा आनंद वेगळाच असून जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून यापुढेही आपण हे शिबीर राबविणार असून माणगाव तालुका मोतीबिंदू मुक्त करण्याचा आपला मानस असल्याचे त्यांनी सांगितले. सदर शिबीर आयोजित करण्यासाठी महेंद्र मेथा यांनी विनामूल्य जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मेथा परिवारातर्फे विशेष आभार व्यक्त केले.

सदर शिबीर यशस्वीरीत्यापार पाडण्यासाठी विजयशेठ मेथा,सुप्रिया शिंदे,तनुजा हेमंत मेथा,छाया मेथा,विधिता मेथा,मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक प्रकाश पाटील, डॉ.ईशा निरगुटकर,नंदिनी देवघरकर,हर्षवी शिंदे,अवंतिका गलांदे,सागर पाटील,प्रवीण पाटील यांनी सहकार्य करीत विशेष परिश्रम घेतले.

# माणगाव शिक्षक पतपेढीचा सुवर्ण महोत्सवी समारंभ रविवारी

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सेवकांची सहकारी पतपेढी लि. माणगाव यावर्षी सुवर्ण महोत्सवी वर्ष रविवार (दि.१२ ) रोजी साजरे करीत आहे. रमेश उभारे यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या सभेला माणगाव गट विकास अधिकारी शुभदा पाटील, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, म.रा. शि.प.(प्राथमिक विभाग) राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, माणगाव पतपेढीचे माजी चेअरमन प्रकाश सुतार, अलिबाग पतपेढीचे माजी चेअरमन संजय निजापकर, पेण पतपेढीचे माजी चेअरमन सूर्यकांत करंजीकर, म.रा. शि.प.(प्राथमिक विभाग) जिल्हाध्यक्ष उदय गायकवाड, म.रा.शिक्षक समिती जिल्हाध्यक्ष विजय येलवे, उर्दू संघटना जिल्हाध्यक्ष खलील बहुर, कें. प्र. व पदवीधर संघटना जिल्हाध्यक्ष कुमार खामकर, शिक्षक संघ थोरात गट जिल्हाध्यक्ष सुभाष भोपी यांची या सुवर्ण महोत्सवी समारंभाला प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या सुवर्ण महोत्सवी समारंभानिमित्त सकाळी ८ते१०.३० वाजता संस्थेच्या कार्यालयात श्री सत्यनारायणाची महापूजा तर १०.३० ते २ वाजता विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन कुणबी भवन माणगाव येथे करण्यात आले आहे. यावेळी सर्व माजी चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालक मंडळ, विद्यमान संचालक मंडळ यांचा सत्कार करण्यात येणार आहे. कमल नागरिक सहकारी पतसंस्था अलिबाग चेअरमन सतीष पाटील यांचे सहकार विषयी मार्गदर्शन आयोजित करण्यात आले असून सुवर्ण महोत्सवी स्मरणिका प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.


**अलिबाग नगरपरिषद**
**जाहीर निविदा सूचना**

अलिबाग नगरपरिषदेकारिता खालील प्रमाणे इच्छुक उमेदवारांद्वारे शासनाच्या GeM portal वर ऑनलाइन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | नग | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | अलिबाग नगरपरिषद करिता स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत sanitary napkin vending machine | ९ | दि.०९/०१/२०२५ ते १७/०१/२०२५ पर्यंत राहिल. वेळ : सायंकाळी ४.०० पर्यंत ठिकाण : GeM portal |
| २ | अलिबाग नगरपरिषद करिता स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत Stainless steel twin bin | ८ | |

अधिक माहिती साठी https://gem.gov.in/ या संकेतस्थळाला भेट द्या.
दि. ०८/०१/२०२५ जा.क्र.अपन/आरोग्य/५९

**सही /–**
**मुख्याधिकारी**
अलिबाग नगरपरिषद



**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड – ४१०२०६
**जाहीर सुचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील जनरेटर संच खरेदी करणे कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधीत Manufacturer/Dealer / Contractor कडून वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे. सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./पमपा/जनसंपर्क/३१२४/
प्र.क्र.०६/०६/२०२५
दिनांक–०७/०१/२०२५

**सही/–**
**शहर अभियंता**
पनवेल महानगरपालिका



**म्हसळा नगरपंचायत, म्हसळा** (जि.रायगड)
**जाहीर सूचना**

म्हसळा नगरपंचायत हद्दीमध्ये सर्व नागरिक व खाजगी संस्था, राजकीय पक्ष, सर्व आस्थापना, सार्वजनिक मित्रमंडळे, सर्व ग्रामस्थमंडळे, सामाजिक कार्यकर्ते यांना सूचित करण्यात येते कि, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे PIL १५५ अंतर्गत दिनांक १८/११/२०२४ रोजीच्या निर्देशानुसार बेकायदा / अनधिकृत पोस्टर, बॅनर, होर्डिंग शहरात उभारण्यास पूर्ण मनाई आहे.

त्यानुसार म्हसळा नगरपंचायत कार्यालयाकडून **१) दिघी नाका चौक २) पाभरे फाटा चौक ३) बायपास पेट्रोल पंप चौक ४) साई चेक पोस्ट** या ठिकाणी शहरात बॅनर लावण्यासंदर्भातील दर व विहित कार्यपद्धती निर्धारित करणेत आलेली आहे. तरी विहित कार्यपद्धतीने परवानगी घेतले नंतरच असे अधिकृत पोस्टर, बॅनर लावण्यात यावेत अन्यथा मा. न्यायालयाचे निर्देशानुसार बेकायदा / अनधिकृत जाहिराती, पोस्टर, बॅनर व होर्डिंग तात्काळ जप्त करणेचे व फौजदारी कारवाई प्रक्रिया करण्यात येईल.

तरी आपलेमार्फत व आपल्या पक्षामार्फत / संस्थामार्फत/मंडळामार्फत पोस्टर, बॅनर, होर्डिंग्स लावावयची असल्यास नगरपंचायत कार्यालयाकडून अथवा महाराष्ट्र शासनाच्या https://mahaulb.in/MahaULB / index या **संकेतस्थळावर विहित कार्यपद्धतीने** परवानगी घ्यावी. पोस्टर, बॅनर, होर्डिंग परवानगी संबधित नगर पंचायतीचे नोडल अधिकारी श्री. साहिल शिंदे व श्री. प्रशांत करडे यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक अनुक्रमे ९८६७९२६८८१ व ८७९३४२०३२५ यावर संपर्क साधावा.

दि. ८/०१/२०२५
जा.क्र. म्हनप/१७२१/२०२५

**सही/–**
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत म्हसळा जिल्हा–रायगड

# सराईत मोटरसायकलचोरास अटक; पाच मोटरसायकली हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरासह तुर्भे व सीबीडी परिसरातुन मोटारसायकली चोरणाऱ्या एका सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे.

पनवेल परिसरातून ३ मोटारसायकली तसेच तुर्भे व सीबीडी परिसरातुन मोटारसायकल चोरीस गेल्याची घटना घडली. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि. विनोद लभडे, पोहवा नितीन वाघमारे, पोहवा अविनाश गंथडे, पोहवा अमोल डोईफोडे, पोहवा परेश म्हात्रे, पोहवा महेंद्र वायकर, पोना विनोद देशमुख, पोशि चंद्रशेखर चौधरी आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध घेतला

सराईत आरोपी अजयलाल कौल (वय ३० वर्षे, रा. करंजाडे) याला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून १ लाख ५ हजार रुपये किमतीच्या ५ मोटारसायकल हस्तगत केले. याच्या अटकेमुळे इतरही वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



# पनवेल तालुक्यात २१ हजार जनावरांचे लसीकरण

**पनवेल : वार्ताहर**

एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ या नऊ महिन्यात पनवेल तालुक्यातील २१ हजार १३३ जनावरांचे लसीकरण करण्यात आले आहे. यात गाय, म्हैस, बैल, शेळ्या, मेंढ्या, कुत्रे, डुक्कर, कोंबडी यांचा समावेश आहे.

जनावरांना घटसर्प, फर्या, लंपी, लाळ्या खुरकूत आदी आजार होतात. यावर उपचार न केल्यास काही जनावरांचा मृत्यू देखील होतो. तालुक्यात गाय व म्हैस वर्ग यातील मोठ्या जनावरांपैकी १ हजार २० जनावरांना घटसर्प आणि फर्याचे लसीकरण करण्यात आले. २ हजार ६०० जनावरांना घटसर्पाची लस दिली. ४ हजार ५९१ जनावरांना लंपी तर दहा हजार ३८० जनावरांना लाळ्या खुरकूत देण्यात आले. ५० थायलेरेसिस, ९० अँटी रेबीज तर १६० ब्रूसेलोसिस देण्यात आले.

दोन हजार शेळया आणि मेंढ्या यांना ईटीव्हीचे लसीकरण तर ४७२ कुत्र्यांना अँटीरेबीजचे इंजेक्शन देण्यात आले. ५० डुक्करांना स्वाईन फेवर आणि पंधराशे कोंबड्यांना फॉलपॉक्स आणि रँनीखेत देण्यात आले. डिसेंबर २०२४पासून तालुक्यात पशुगणनादेखील सुरू करण्यात आली आहे.

पनवेल तालुक्यातील १५५ गावे आणि पनवेल महानगरपालिका हद्दीतील २० गावे अशी एकूण १७५ गावांमध्ये पशुगणना सुरू करण्यात आली आहे. १३ गावात पशुगणना पूर्ण झाले असून ९९ गावांमध्ये सध्या पशुगणना सुरू आहे. त्यानंतर पुढील गावांमध्ये पशु गणना सुरू करण्यात येणार आहे. पशुगणनेसाठी ग्रामीण भागात १६ पशुगणना प्रगणक तर महापालिका हद्दीत ४० पशुगणना प्रगणक काम करत आहेत.

दोन ते तीन वर्षांपूर्वी राज्यात लंपी रोगाची लागण झाली होती. २०२२-२३ मध्ये लंपीमुळे तालुक्यातील ३ बैलांचा मृत्यू झाला होता. तालुक्यात गेल्या ९ महिन्यात अडलेल्या ५३ गाय, म्हैस, शेळी या जनावरांची सुरक्षित प्रसूती करण्यात आली. यात जनावरांचा मृत्यू झालेला नाही.

# युईएस कॉलेजमध्ये विविध कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

मुंबई विद्यापीठाच्या आदेशानुसार यु. ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड टेक्नॉलॉजी मध्ये विदयार्थ्यांसाठी वाचन संकल्प महाराष्ट्राचा ही मोहिम आयोजित करण्यात आली होती. त्यानिमित्ताने यु. ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड टेक्नॉलॉजी मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

१ जानेवारी २०२५ रोजी यु. ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड टेक्नॉलॉजीच्या ग्रंथालयामध्ये विदयार्थ्यांसाठी सामूहिक वाचन आणि ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले होते. ग्रंथ प्रदर्शनामध्ये व्यक्तिमत्त्व विकास, प्रेरणादायी ग्रंथ,



चरित्र ग्रंथ, संदर्भ ग्रंथ आणि विविध विषयांवरील ग्रंथांची मांडणी केली होती. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन करुन ग्रंथ प्रदर्शनाचा आनंद घेतला.

२ जानेवारी २०२५ रोजी विदयार्थ्यांच्या आवडीच्या पुस्तकांचे अभिवाचन स्पर्धा ठेवली होती ज्यामध्ये विदयार्थांनी आपल्या आवडीच्या कथा, कांदबरी, कविता संग्रहातील उतारा वाचून दाखविला . तसेच विविध विषयांच्या लेखकांचा विदयार्थ्यांशी संवाद ह्या कार्यक्रमासाठी शब्दरुप या चारोळी संग्रहाचे कवी व लेखक श्री. गणेश जाधव ह्यांना प्रमुख पाहूणे म्हणून आमंत्रित केले होते. ज्यांचा परिचय सिनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता ह्यांनी विदयार्थांना करुन दिला. त्यांच्यासोबत सिनियर कॉलेजच्या आय. टी आणि कॉमर्स विभागाच्या विभाग प्रमुख व सर्व शिक्षक उपस्थित होते. त्यानंतर श्री. गणेश जाधव यांनी विदयार्थ्यांशी संवाद साधून पुस्तकांबद्दल मौलीक असे मार्गदर्शन केले.

यु. ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड टेक्नॉलॉजीच्या भव्य पटांगणात (दि.४) रोजी ग्रंथ दिंडीचे आयोजन केले होते. ग्रंथ दिंडीसाठी विद्यार्थी पारंपारिक वेशभूषा परिधान करुन आले होते. विद्यार्थ्यांनी लेझीमच्या तालावर ग्रंथ दिंडीची सरस्वती मंडपात आणली. सिनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पालखीतील सार्थ ज्ञानेश्वरीचे व भगवद् गीतेचे पुजन केले. त्यानंतर पालखीसोबत व्यासपीठावर मांडलेल्या पुस्तक प्रदर्शनाचाही सर्वांनी लाभ घेतला. सर्व कार्यक्रमाचे आयोजन सिनियर कॉलेजच्या ग्रंथालय समितीचे सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वीपणे केले. अशा रितीने यु. ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ण्ड टेक्नॉलॉजी मध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा ही मोहिम जल्लोषपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

# सामान्यांतून घडलेला नेता, रोह्याचा प्रेरणादायी चेहरा अमित घाग

साधेपणा, प्रामाणिक मेहनत, आणि सामान्य माणसाशी जुळलेली नाळ यामुळे रोहा तालुक्याच्या राजकीय पटलावर एक आदर्श नेता म्हणून ओळख मिळवणारे नाव म्हणजे अमित घाग. संघर्षमय परिस्थितीतून उभे राहत त्यांनी आपले जीवन समाजसेवेसाठी समर्पित केले आहे.

**संघर्षातून यशाकडे : घाग यांची प्रेरणादायी सुरुवात**

अमित घाग यांचा जन्म रोठ बुद्रुक या छोट्याशा गावात एका साध्या आणि हलाखीच्या परिस्थितीत झाला. दोन भाऊ, एक बहीण आणि आई-वडिलांसह अतिशय कष्टमय जीवन जगणाऱ्या कुटुंबात त्यांनी बालपण घालवले. कुटुंबातील मोठा मुलगा असल्याने जबाबदाऱ्या त्यांच्या खांद्यावर लवकरच आल्या. त्याही परिस्थितीत त्यानी आपले बि .ए पर्यंत शिक्षण पुर्ण केले . राजकीय वशील्याच्या अभावी एम आय डीसी मध्ये नोकरी मिळण्यास अडचणी येत होत्या . त्यांनी जाधव नर्सिंग होममध्ये एक्स-रे टेक्निशियन म्हणून काम करण्यास सुरुवात केली. प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ अशोक जाधव यांचे विश्वासू सहकारी म्हणून काम करताना घाग यांनी अनेक गोरगरिबांना मदतीचा हात पुढे केला.जाधव नर्सिंग होममध्ये काम करत असतानाच त्यांनी गरजू आणि उपेक्षित लोकांशी जवळीक साधली. त्यांच्या मदतीसाठी नेहमीच पुढे सरसावणाऱ्या घाग यांच्यावरील लोकांचा विश्वास वाढत गेला. साध्या माणसाचे दुःख समजून घेण्याची क्षमता आणि तातडीने मदतीसाठी पुढे येण्याच्या वृत्तीमुळे ते हळूहळू जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवू लागले. अमित घाग यांच्या संघर्षमय प्रवासात त्यांच्या साधेपणाने आणि कर्तव्यनिष्ठेने महत्त्वाची भूमिका बजावली. सामान्य कुटुंबातील हा तरुण कष्ट आणि जिद्दीच्या जोरावर राजकीय नेतृत्वाच्या शिखरावर पोहोचला. व त्यांच्या कार्याने रोह्याच्या लोकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. सामान्य माणसासाठी लढणारा नेता अमित घाग आजही संघर्षातूनच आपला मार्ग तयार करतो, म्हणूनच ते रोह्याचे विश्वासू चेहरा बनले आहेत .

**भाजपच्या मातबर नेत्यांचा विश्वासू शिलेदार, कोहिनूर हिरा : अमित घाग**

भाजपचे प्रभावी नेते आमदार रविंद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील आणि महामंत्री सतीश धारप यांच्या नेतृत्वाखालील तालीमीत घडलेला एक चमकदार कोहिनूर हिरा म्हणजे अमित घाग. साध्या पार्श्वभूमीतून उभा राहून राजकीय मैदानात आपल्या मेहनतीने आणि जिद्दीने अमित घाग यांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

**नेतृत्वगुण आणि निष्ठा** – घाग यांच्या कार्यशैलीत पक्षाशी निष्ठा, नेतृत्वगुण आणि काम करण्याची तळमळ नेहमीच दिसून आली आहे. त्यांनी रायगड जिल्ह्यात युवकांचा सहभाग करून पक्ष संघटन बांधणी आणि कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम अतिशय प्रभावीपणे केले आहे. आ. रविंद्र चव्हाण यांची दूरदृष्टी, आ. प्रशांत ठाकूर यांचे मार्गदर्शन, आ. रविशेठ पाटील यांचा सल्ला आणि महामंत्री सतीश धारप यांचे राजकीय धोरण या सगळ्यांचा एकत्रित परिणाम घाग यांच्या यशस्वी प्रवासावर दिसून येतो. या मातबर नेत्यांचा विश्वास मिळवणे हेच घाग यांच्या नेतृत्व क्षमतेचे प्रमाण आहे. सामान्य माणसात नेते घडवण्याचे भाजपच्या







तत्त्वज्ञानाचे उत्तम उदाहरण म्हणजे अमित घाग.

**राजकीय प्रवासाची सुरुवात; मनसेतून उभारलेली जनप्रिय ओळख**

अमित घाग यांनी आपल्या राजकीय प्रवासाची सुरुवात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून (मनसे) केली. संघर्षशील स्वभाव आणि सामान्यांसाठी लढण्याच्या जिद्दीमुळे त्यांनी या पक्षातून आपली ओळख तयार केली. घाग यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी नेहमी पुढाकार घेतला. शाळेच्या प्रशासनावर दडपण टाकून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आंदोलने केली. त्यांच्या ठाम भूमिकेमुळे ते तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रिय झाले.

**पहिली राजकीय चाचणी** – राजकीय अनुभव नसताना, आणि आर्थिक पाठबळाची कमी असतानाही, घाग यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर रोठ बुद्रुक ग्रामपंचायतीमध्ये दोन सदस्य निवडून आणले. हा विजय केवळ निवडणूक यश नव्हता, तर घाग यांच्या नेतृत्वगुणांचे प्रत्यक्ष प्रदर्शन होते. मनसेतील धडपडीतून सुरू झालेला प्रवास, तरुणांसाठी उभ्या राहण्याच्या जिद्दीने आणि सामान्यांच्या प्रश्नांसाठी झटण्याच्या भूमिकेने अमित घाग यांना जनतेच्या मनात खास स्थान मिळवून दिले.

**अमित घाग यांचा भाजप प्रवासाचा नवा अध्याय** – २०१६ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रभावी कार्यशैलीकडे आकर्षित होऊन अमित घाग यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्या वेळीचे भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत भाजप महामंत्री अॅड. महेश मोहिते यांच्या पाठबळाने त्यांनी आपल्या अनेक कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. प्रवेशानंतर लगेचच त्यांना युवा मोर्चा रोहा तालुका अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. घाग यांनी आपल्या नेतृत्वगुणांमुळे आणि कामगिरीमुळे अल्पावधीतच पक्षासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या उत्कृष्ट कार्यशैलीने प्रभावित होऊन पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांना रायगड जिल्हा युवा मोर्चा अध्यक्षपद दिले. घाग यांनी या पदावर संपूर्ण रायगड जिल्ह्यात बुथ कमिट्यांचे गठण, पक्षबांधणी, आणि युवकांना एकत्रित करून एक नवा उर्जावान गट निर्माण केला. त्यांच्या नेतृत्वाने रायगड जिल्ह्यातील भाजप संघटना अधिक बळकट होण्यास मदत झाली. नेतृत्वाची ओळख ही त्याच्या कामातून होते, आणि अमित घाग हे त्याचे जिवंत उदाहरण आहेत.

**बलाढ्य आव्हानांना सामोरे जाणारे धैर्यशील नेतृत्व** – रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत अमित घाग यांनी आपल्या पक्षनिष्ठेचा आणि धैर्याचा ठसा उमटवला. वरसे जिल्हा परिषद गणातून त्यांनी आपली पत्नी, सौ. श्रद्धा घाग यांना भाजपाच्या उमेदवार म्हणून मैदानात उतरवले. समोर बलाढ्य राजकीय शक्ती असल्यामुळे इतर सर्व उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले, मात्र अमित घाग यांनी संघर्षाचा मार्ग स्वीकारत हा लढा ठामपणे लढण्याचा निर्णय घेतला.

**पक्षनिष्ठेचा आदर्श** – पराभव झाला तरी चालेल, पण भाजपाचे कमळ तळागाळात पोहोचवण्याचा माझा संकल्प कायम आहे, असे म्हणत अमित घाग यांनी पक्ष निष्ठेचे उत्तम उदाहरण घालून दिले. त्यांचा पराभव झाला, पण त्यांची जिद्द, धैर्य, आणि पक्षाशी असलेली निष्ठा सर्वांच्या मनात घर करून गेली. या निवडणुकीत अमित घाग यांनी फक्त राजकीय लढा दिला नाही, तर कार्यकर्त्यांसाठी निर्भीड नेतृत्वाचे उदाहरणही प्रस्थापित केले. पराभवाची भीती न बाळगता त्यांनी पक्षाच्या विचारधारेचा प्रचार आणि कमळ चिन्ह तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवले.

**उद्याचा आश्वासक चेहरा** – या लढाईने अमित घाग यांच्या नेतृत्वगुणांची झलक सर्वांनाच दिसली. त्यांच्या कार्यकौशल्यामुळे आज ते रायगड जिल्ह्यातील एक विश्वासू आणि आश्वासक चेहरा म्हणून उभे राहिले आहेत. पक्ष निष्ठा आणि जिद्दीच्या बळावर बलाढ्य आव्हानांनाही तोंड देता येते, हे अमित घाग यांनी दाखवून दिले.

**युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष म्हणून उल्लेखनीय कामगिरी** – अमित घाग यांनी रायगड जिल्हा युवा मोर्चा अध्यक्षपदाच्या कार्यकाळात आपल्या नेतृत्वगुणांचा ठसा उमटवला. त्यावेळचे युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस आणि सध्याचे महाराष्ट्र भाजपचे प्रदेश महामंत्री, विधानपरिषद आमदार श्री विक्रांत दादा पाटील यांच्या विशेष सहकार्याने त्यांनी जिल्ह्यात युवकांसाठी प्रेरणादायी सीएम चषक क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सीएम चषक उपक्रमाअंतर्गत घाग यांनी म्हसळा, श्रीवर्धन, रोहा, पेण, महाड, अलिबाग, आणि मुरुड,कर्जत,उरण,पनवेल येथे विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धांमुळे जिल्ह्यातील युवकांना प्रोत्साहन मिळाले आणि त्यांची संघटनशीलता अधिक बळकट झाली. क्रीडा क्षेत्रातील नव्या पिढीला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमासाठी त्यांचे नेतृत्व कौतुकास्पद ठरले. **महत्त्वाच्या निवडणुकांमध्ये निर्णायक भूमिका**– लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये अमित घाग यांनी भाजपच्या उमेदवारांच्या विजयासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. अलिबाग, मुरुड, पेण, आणि श्रीवर्धन मतदारसंघांमध्ये स्थानिक नेत्यांसोबत घनिष्ठ समन्वय साधून त्यांनी पक्ष संघटन मजबूत केले आणि विजयाचा मार्ग प्रशस्त केला. अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्हा युवा मोर्चा कार्यक्षमता, कर्तव्यनिष्ठा, आणि प्रभावी संघटनाचा आदर्श बनला. अमित घाग यांना पक्षश्रेष्ठींचा विश्वास – नेतृत्वाला मिळाले नवे आयाम अमित घाग यांच्या मेहनत, समर्पण, आणि नेतृत्वगुणांची दखल घेत भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांना दोन वेळा युवा मोर्चा रायगड जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली होती. त्यांच्या प्रभावी कार्यप्रणालीमुळे पक्ष संघटनात त्यांनी आपली ठसा उमटवली आहे. आता, रायगड जिल्हाध्यक्ष आणि खासदार धैर्यशील पाटील यांनी त्यांच्यावर आणखी विश्वास ठेवत, भाजपच्या मुख्य संघटनेत रोहा तालुकाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी दिली आहे. अमित घाग हे तालुकाध्यक्ष म्हणून आपले दायित्व यशस्वीपणे पार पाडत आहेत आणि पक्षाचे कार्यक्षेत्र अधिक बळकट करत आहेत. पक्षाच्या निष्ठेने आणि जनतेशी नाळ जुळवत, अमित घाग आपल्या नेतृत्वाने पक्षाला सतत पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

**कोरोना संकटात फ्रंटफुटवर कार्य करणारा नेता** – कोरोना महामारीच्या संकटकाळात, जेव्हा प्रत्येकाने घरात राहण्याचा पर्याय स्वीकारला, तेव्हा अमित घाग यांनी आपल्या नेतृत्वाची खरी परीक्षा दिली. त्यांनी केवळ स्वयंसेवी उपक्रम मास्क, सॅनिटायझर, औषधांचे वाटप, कोरोना कीट यांसारख्या उपक्रमांसोबतच, घाग यांनी सरकारी रुग्णालयाला मदत केली. त्या काळात रोहा सरकारी रुग्णालयात तात्पुरत्या शेडचे निर्माण करून त्यांनी रुग्णांच्या निवासाची सोय केली. त्यांनी तालुक्यातील अनेक कोरोना रुग्णांसाठी पनवेल आणि मुंबईसारख्या शहरांमध्ये बेड उपलब्ध करून दिले.

**स्वयंसेवी सेवा : राजमुद्रा फाउंडेशन**– कोरोनाची लागण अमित घाग यांनाही झाली व अतिशय गंभीर स्थितीत ते पनवेल येथील रुग्णालयात दाखल झाले , परंतु त्यातून सावरण्याच्या नंतर ही त्यांनी थांबण्याचे ठरवले नाही. आपल्या राजमुद्रा फाउंडेशन च्या माध्यमातून त्यांनी कोरोना रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोफत जेवणाची सोय उपलब्ध करून दिली. या उपक्रमामुळे हजारो नागरिकांना दिलासा मिळाला. आमदार प्रशांत ठाकूर यांचा समर्थन: अमित घाग यांच्या या अत्युत्तम कार्याची दखल घेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या राजमुद्रा फाउंडेशनकडे दोन ऑक्सिजन कन्संट्रेटर सुपूर्त केले. या किटमुळे शेकडो रुग्णांना जीवनदान मिळाले. घाग यांच्या सामाजिक सेवेचे आणखी एक मोठे उदाहरण म्हणजे आपल्या रुग्णवाहिके मार्फत केलेली सेवा . कोरोणा कालात अनेकदा चालक उपलब्ध नसताना त्यांनी स्वतः गाडी चालवून रुग्णांना रुग्णालयात पोहोचवले. अशा कठीण काळात त्यांनी केवळ नेता म्हणून नाही, तर एका समर्पित सेवकाच्या भूमिकेतून आपले कर्तव्य पार पाडले. अमित घाग यांचे हे कार्य फक्त राजकारणात नाही, तर समाजसेवेतही उत्कृष्टतेचे उदाहरण ठरले आहे. कोरोना संकटाच्या काळात, घाग यांचे नेतृत्व आणि समर्पण समाजासाठी प्रेरणादायी ठरले.

**तरुणांसाठी रोजगारनिर्मितीचे योगदान**– रोहा तालुक्यातील तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा अमित घाग यांचा प्राधान्यक्रम राहिला आहे. विशेषतः आयटीआय पूर्ण केलेल्या तरुणांसाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. त्यांच्या माध्यमातून शेकडो तरुणांना एमआयडीसीतील विविध कंपन्यांमध्ये रोजगार मिळाला आहे. अमित घाग यांनी आपल्या कार्यकाळात स्थानिक तरुणांच्या रोजगाराच्या गरजांवर लक्ष केंद्रित केले. एमआयडीसीतील कंपन्यांसोबत समन्वय साधून त्यांनी तरुणांना नोकऱ्या मिळवून दिल्या. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आज अनेक तरुण आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाले आहेत.

**स्वानुभवातून प्रेरणा** – माझ्या गरजेच्या वेळी कुठल्याही नेत्याने मला नोकरी मिळवून दिली नाही, पण दुसर्यांना रोजगार देण्याचे कार्य माझ्या माध्यमातून होत आहे यासाठी मी भगवंताचे नेहमीच आभार मानतो, असे ते अभिमानाने सांगतात. तरुणांच्या भविष्याचा विचार करून त्यांनी राबवलेले उपक्रम आज त्यांच्या नेतृत्वाला प्रेरणादायी बनवतात. सामान्य माणसाच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी सतत प्रयत्न करणारा एक नेता म्हणून अमित घाग यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. तरुणांना रोजगाराच्या वाटा दाखवणे म्हणजे त्यांच्या भविष्याला दिशा देणे, आणि अमित घाग हे काम प्रामाणिकपणे करत आहेत.

**गोरगरिबांसाठी झटणारे नेता** – सामान्य जनतेच्या समस्यांवर आवाज उठवत, त्यांच्या हक्कांसाठी झगडणारे अमित घाग हे रोहा तालुक्यातील एक विश्वासार्ह आणि प्रेरणादायी नेतृत्व आहेत. त्यांच्या कार्यशैलीत जनहित आणि कर्तव्य यांची सांगड स्पष्टपणे दिसते.

**गोरगरिबांसाठी लढा**– लाईट बिलांच्या अन्यायावर ठोस भूमिका : अधिकाऱ्यांना थेट जाब विचारून अन्यायकारक बिलांची दुरुस्ती. भ्रष्टाचाराविरोधात आंदोलन : पंचायत समित्यांमधील भ्रष्टाचारावर आवाज उठवत, जनतेसाठी स्वच्छ कारभाराची मागणी. ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न सोडवले : पेन्शन मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. महिलांसाठी विशेष योजनांचे राबवण: महिलांना प्राधान्य देऊन त्यांच्या हक्कांसाठी काम केले. दिव्यांग बांधवांची साथ: दिव्यांगांसाठी सतत मदतीचा हात पुढे करत त्यांचे प्रश्न सोडवले.

**नव्या पिढीचा प्रेरणादायी चेहरा** – अमित घाग हे फक्त राजकारणापुरते सीमित न राहता नव्या पिढीला पुढे नेण्यासाठी झटणारे नेता आहेत. त्यांच्या साधेपणाने आणि प्रामाणिकपणाने त्यांनी सामान्य माणसाच्या मनात आपले स्थान निर्माण केले आहे. रोह्याच्या विकासासाठी, युवकांच्या प्रगतीसाठी आणि सामान्य जनतेच्या हक्कांसाठी लढणारे एक निष्ठावंत नाव म्हणजे अमित घाग.

**जितेंद्र जाधव (वृत्तांकन)**

Advt.

## निवडक



### पद्मदुर्गसंदर्भातील पुस्तकांचे प्रकाशन

**मुरुड :** पद्मदुर्ग जागर सोहळ्याचे औचित्य साधून मुरुड इतिहासाचा पुरातत्वीय मागोवा व श्री शिवछत्रपतींच्या पद्मदुर्गचा यांनी इतिहास उलगडणाऱ्या दोन पुस्तकांचे प्रकाशन मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आशिलकुमार ठाकुर, मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर, पुरातत्व शास्त्रज्ञ प्रितम वाळंज, इतिहास अभ्यासक अनिकेत पाटील,सुरेश पवार, राहुल कासार, संकेत वडके, विजय वाणी आदिंसह शिवप्रेमी उपस्थित होते.

### फराट पाडा येथे नामयज्ञ सोहळा



**कर्जत :** कळंब वांगणी रस्त्यावरील फराट पाडा येथील श्रीराम ग्रामस्थ मंडळ यांच्या माध्यमातून अखंड नामयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी दीपोत्सव निमित्त हभप शीतलताई साबळे यांनी हरिकिर्तन सादर केले.तर काल्याचे कीर्तन ह.भ.प. कैलास महाराज भोईर यांनी केले. ह.भ.प. नितीन मंगळ फराट यांनी बहरीनाम सप्ताह फराटपाडा गावात सुरू केला. अंबरनाथ पंचायत समीतीचे माजी सभापती सभाजी अंनता कडव,जगदीश महाराम सिंग (पापाजी) आणि कैलास महाराज भोईर यांनी हा सप्ताह सुरू करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे.

### परसले येथे विज्ञान प्रदर्शन

**पोलादपूर :** तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन रायगड जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळा परसले येथे यशस्वीपणे आयोजित करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्धाटन माजी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांच्या हस्ते पोलादपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या विज्ञान प्रदर्शनात सहावी ते आठवी व नववी ते बारावी अशा दोन गटात तालुक्यातील सर्व उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांनी सहभाग घेतला होता. प्रदर्शनासाठी प्राथमिक, माध्यमिक शाळा येथील सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक शिक्षक यांनी विद्यार्थी विज्ञान प्रदर्शनाच्या ठिकाणी आणून सहभाग घेतला.

### कर्जत येथे रक्तदान शिबिर

**कर्जत :** नरेंद्राचार्य महाराज संस्थान महाराष्ट्र यांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे भव्य रक्तदान महायज्ञाचे आयोजन उपजिल्हा रुग्णालय कर्जत येथे करण्यात आले होते. या शिबिरात ५७ जणांनी रक्तदान केले. सार्वजानिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी कर्जत-खालापूर तालुक्यात आयोजित केलेले हे ५०४वे रक्तदान शिबिर ठरले. या रक्तदान शिबिरात प्रथम रक्तदान सुयोग झगडे यांनी केले. संजीव ठाकरे, अमिर मणिया, रघुनाथ मराडे, विजय लोभी, हेमंत पवार, अनिल कडू, मोहिनी लोभी, ऋतुजा पडलकर, अर्पिता सावळ, गीता पाटील, शर्मिला कारंडे, लता कडू, दिलीप पडळकर, चिंतामण खडे, अशोक भाटकर, रविंद्र पाटील आदी उपस्थित होते.



# परळीत कृषी सेवा केंद्र

## माजी जि.प. अध्यक्ष नीलिमा पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

**पाली : प्रतिनिधी**

नाबार्ड पुणे महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र सरकारच्या दहा हजार शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या योजने अंतर्गत प्रस्थापित सुधागड वैभव फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. शेतकऱ्यांसाठी माफक दरात खते बियाणे औषधे आणि शेती उपयोगी वस्तूंसाठी सुधागड येथे कृषी सेवा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.



या वेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अ‍ॅड. निलिमा पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सुधागड या आदिवासीबहुल तालुक्यात शेतकऱ्यांचे भरभक्कम संघटन उभारून शेतीशी निगडित प्रशिक्षणाद्वारे शेतकऱ्यांमध्ये जागरूकता आणणे तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यासोबत सामंजस्य करार करून शेतमालाची देवाणघेवाण करून सभासदांना आर्थिक स्तर वाढविण्याचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

या केंद्राला खासदार धैर्यशील पाटील, पंचायत समितीचे श्री. महामुनी, मिलिंद चौधरी, तालुका कृषी अधिकारी कावळे, मराठा समाज अध्यक्ष धनंजय साजेकर, विभागीय व्यवस्थापक एमसीडीसीचे सादिक मनेरी, बळवंत धुमाळ, राज्य समन्वयक, व्यवस्थापकीय संचालक मंगेश तिटकारे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण अधिकारी गोरक्षनाथ मिरकुटे,पळस्पे सरपंच चंद्रकांत भोईर यांनीही या वेळी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास कंपनी लि.चे अध्यक्ष विराज लोंढे, उपाध्यक्ष वैभव शिंदे, सचिव संजय पवार, संचालक नथुराम काटकर, संचालक शर्मिला गायकवाड, प्रमोटर शशिकांत पाशीलकर, खजिनदार पांडुरंग शिंदे, प्रमोटर रुपेश देशमुख, प्रमोटर गणपत आमनकर, प्रमोटर विमल प्रकाश भोईर आदी उपस्थित होते.

## महिला अत्याचारांमध्ये वाढ

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात २०२३वा वर्षाच्या तुलनेत २०२४ या वर्षभरात महिलांबाबतच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. यात १०७ बलात्काराच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. यातील ७४ बलात्कार अल्पवयीन मुलींवरील आहेत.

रायगड पोलिसांनी नुकतीच गुन्हेगारीची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. या आकडेवारीनुसार रायगड पोलीस अधिक्षक कार्यक्षेत्रात गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याचे दिसते. त्यातही महिलांवरील गुन्ह्यांचे प्रमाण मागील पाच वर्षात वाढत आहे. २०१९-२०पर्यंत रायगड जिल्ह्यात महिलांवरील लैंगिक अत्याचाराचे सरासरी वार्षिक ५० गुन्हे दाखल होत होते. गेल्या तीन वर्षांत महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांचे प्रमाण दुपटीने वाढले आहे. जिल्ह्यात वार्षिक सरासरी १०० गुन्हे दाखल होऊ लागले आहेत. यातही अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार वाढले आहेत.

बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याअंतर्गत (पॉस्को) दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या लक्षणीयरित्या वाढली आहे. बलात्काराचे १०७पैकी ७४ गुन्हे हे पोक्सो कायद्याच्या अंतर्गतचे आहेत. म्हणजेच ही सर्व प्रकरणे अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराशी निगडीत आहेत.

मागील वर्षाच्या तुलनेत २०२४ या वर्षात महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. २०२४ या वर्षात महिलांवर बलात्काराचे १०७ गुन्हे दाखल होते. हे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२४मध्ये विनयभंगाचे १५७ गुन्हे दाखल झाले होते. २०२४ या वर्षात अपहरणाचे १३० गुन्हे दाखल झाले होते. त्यात ९७ मुली आहेत. अपहरण करण्यात आलेल्या सात मुलींचा शोध अजून लागलेला नाही.

## किल्ले रायगड राज्यस्तरीय गडारोहण स्पर्धा; सहभागी होण्याचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ स्थानिक उत्सव समिती महाड यांच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे राज्यस्तरीय किल्ले रायगड गडारोहण स्पर्धेचे आयोजन रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७ वाजता किल्ले रायगड येथे करण्यात आले आहे.

स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने प्रतिवर्षीप्रमाणे किल्ले रायगड येथे सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व वयोगटासाठी ही स्पर्धा असून चित्तदरवाजा-महादरवाजा-हत्ती तलावाच्या डावीकडून होळीचा माळ असा स्पर्धेचा मार्ग असणार आहे. रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७ वाजता स्पर्धा सुरू होणार आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ३० रुपये असणार आहे. नावे नोंदणीसाठी ११ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजता पाचाड धर्मशाळा येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. सर्वांसाठी भोजन व्यवस्था शनिवारी रात्री तसेच रविवार दि. १२ जानेवारी रोजी अल्पाहार देण्यात येणार आहे.

या स्पर्धेचे स्पर्धा प्रमुख म्हणून योगेश भागवत, निशांत देशमुख हे काम पाहत आहेत. या स्पर्धेमध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन कार्यवाह संतोष कदम यांनी केले आहे. या स्पर्धेत नाव नोंदणी करण्यासाठी महेश गायकवाड पाचाड (८१४९२४८८७२), अविनाश चव्हाण (९८९०४२३४७८), संतोष माटेकर (७७७४८७८४३२), श्रीकृष्ण गरधे (७७७४८७८४३२), विनोद लाड (७५८८९००४४७), यतिराज पाटील (९९२११७१७००), संतोष जोरकर (९४२१०९२९१४), सुधीर थोरात (९४२२०९६५३९), रुपेश मोरे (९२७२७२४६०९), ऋषिकेश जगदाळे (९९२११७१७००) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पेणमध्ये पत्रकारांचा सन्मान

**पेण : प्रतिनिधी**

आपल्या लेखणीद्वारे विविध विषयांवर प्रकाश टाकून समाजप्रबोधनाचे कार्य करणाऱ्या पेणमधील पत्रकारांचा रोटरी क्लब ऑफ पेणच्या वतीने महात्मा गांधी मंदिर येथे सन्मान करण्यात आला.

या सोहळ्यास सचिव मधुबाला निकम, सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे, जयेश शहा, पुनमिया, मितेश शहा, जयंत आपटे, मुकुंद टेमघरे, ईश्वरे, सुजाता जाधव, विजय शहा आदींसह पत्रकार उपस्थित होते.

या वेळी हरिष बेकावडे यांनी सांगितले की, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून न्याय देण्याचे काम पत्रकार करीत आहेत. यामुळे रोटरी क्लब ऑफ पेणच्या वतीने त्यांचा गौरव व्हावा या दृष्टीकोन समोर ठेवून आज पेणमधील पत्रकारांचा सन्मान करण्यात येत आहे.

मधुबाला निकम, सुजाता जाधव यांनी कवितेच्या माध्यमातून व मनोगतातून पत्रकारांच्या कार्याचा गौरव केला. या वेळी पत्रकारांचा प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.




## नागोठणे येथे मोफत नेत्रचिकित्सा शिबिर

**नागोठणे : बातमीदार**

लायन्स क्लब नागोठणेतर्फे तसेच आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटल पनवेल यांच्या सहकार्याने व राष्ट्रवादीचे नेते हरिष काळे यांच्या वतीने कै. किसन शिवराम काळे व कै.इंदुमती किसन काळे यांचे स्मरणार्थ मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले.



या शिबिरामध्ये एकूण ५१ नागरिकांची नेत्र चिकित्सा करण्यात आली. यामध्ये १६ मोतिबिंदू रुग्ण आढळले. मोतीबिंदू असलेल्या सर्वांना पनवेल येथे शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले.

या शिबिरास हरिष काळे, विलास चौलकर, विवेक सुभेकर, घिसूशेठ जैन, दौलत मोदी, यशवंत चित्रे, सुनील कुथे, संतोष शहासने, डॉ. अनिल गीते, सुजाता जवके, दिपक गायकवाड, विनोद सावंत, हरिष काळे यांचे जावई अ‍ॅड. निलेश चांदवडकर, रचना निलेश चांदवडकर, सखाराम ताडकर, प्रथमेश काळे, सिद्धेश काळे, डॉ. साधना झोलगे, दीपक लोणारी आदी उपस्थित होते.

दरम्यान, मोफत मोतिबिंदू शिबिर लायन्स क्लब नागोठणेतर्फे दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी घेण्यात येते. याबाबत अधिक माहितीसाठी ९२७०४९९११३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन विवेक सुभेकर यांनी केले आहे.

## मराठी माध्यमातून शिकलेले अनेक विद्यार्थी उच्च पदावर -अ‍ॅड. नेने

**पेण : प्रतिनिधी**

आजकाल पालकांचा इंग्रजी माध्यमातून मुलांना शिकविण्याचा ओढा वाढत आहे परंतु मराठी माध्यमातून शिकलेली मुलेही आज उच्च पदावर कार्यरत आहेत, असे प्रतिपादन अ‍ॅड. बापूसाहेब नेने यांनी पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेच्या स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक समारंभावेळी केले.



या कार्यक्रमास संस्थेचे उपकार्याध्यक्ष संजय कडू, संचालक डॉ. निता कदम, संमेलन कार्याध्यक्ष कविता पेडणेकर, राम दातार, माजी मुख्याध्यापिका कलावती पाटील, बालवाडी मुख्याध्यापिका सविता पाटील मॅडम, सुषमा साखरे, पालक सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बोलताना बापूसाहेब नेने यांनी सांगितले कि, पडत्या काळात पेण एज्युकेशन सोसायटीची धुरा सांभाळून आज यशस्वीरीत्या ही संस्था उभारण्याचे काम मी आणि माझ्या सहकार्यांनी त्या वेळी केले. या वेळी यशस्वी विद्यार्थ्यांना अ‍ॅड. बापूसाहेब नेने यांनी अभिनंदन करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या वेळी एमटीएस, टिळक महाराष्ट्र गणित परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा तसेच शालेय स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते बक्षिस देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी पहिले ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी विविध नृत्यावर कला सादर करून उपस्थित मान्यवरांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुषमा साखरे यांनी केले.

## चोरढे शाळेची मुंबई दर्शन सहल

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा चोरढे येथील मराठी शाळेची शैक्षणिक सहल इयत्ता पाचवी ते सातवीच्या ४१ विद्यार्थ्यांची सहल मुंबई दर्शन येथे नेण्यात आली होती. याबाबत पालकांचे मोठ्या प्रमाणावर सहकार्य लाभले. सकाळी साडेपाचला निघाल्यावर सि लिंक द्वारे मुले मुंबईत दाखल झाली.

सर्व प्रथम मुंबईचे प्रवेशद्वार गेटवे ऑफ इंडिया, ताज हॉटेल आदी बाबींची विद्यार्थ्यांना माहिती दिली. यानंतर गेटवे ऑफ इंडिया जवळीलच वस्तुसंग्रहालयात विद्यार्थ्यांना नेण्यात आले.या वस्तुसंग्रहालयात विविध प्राणी, पक्षी यांचे चित्रे शिल्पे, ढाल , भाले, तलवार, इत्यादी बाबींची मुलांनी प्रत्यक्ष पाहून माहिती देण्यात आली.

त्यानंतर नेहरू तारांगणात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पृथ्वी कशी तयार झाली, आकाशातील नक्षत्र, तारे, तारका समूह इत्यादी बाबीची पडद्यावर शोद्वारे माहिती बघितली. या वेळी आपल्या मुरुड तालुक्यातील आदर्श शाळा मजगाव येथील विद्यार्थी व शिक्षक वृंद सोबत होते. यानंतर विद्यार्थ्यांना भायखळा येथील राणीच्या बागेत देण्यात आले.

अश्या प्रकारे चोरढे मराठीची शैक्षणिक सहल अतिशय आनंदी व प्रसन्न वातावरणात पार पडली. सहल यशस्वी करण्यासाठी मदत करणारे गट शिक्षण अधिकारी सुनील गवळी शिक्षक वृंद, सर्व पालक, सर्व विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.



## भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोठ खुर्द प्राथमिक शाळेत भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी (दि. ८) सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. शाळेच्या परिसरात विविध प्रकारचे वृक्ष लागवड करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांना खाऊ, शाळेच्या मागणीनुसार प्रत्येक वर्गाला भिंतीवरील घड्याळ रोठ खुर्द भाजप बूथ प्रमुख सचिन मोरे यांच्या माध्यमातून देण्यात आला.

या कार्यक्रमाला भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, युवा मोर्चा शहर अध्यक्ष अनिल घरजाळे, कामगार सेल अध्यक्ष विलास डाके, भाजप तालुका कोषाध्यक्ष राजेश डाके, रोठ बुद्रुक ग्रामपंचायत सदस्य वैभवी भगत, राजमुद्रा फाउंडेशनचे कार्याध्यक्ष राजेश भगत, रोठ खुर्द भाजप बुथ अध्यक्ष सचिन मोरे, नितेश कर्णेकर, सदानंद मोरे माजी उपसरपंच, देवराम कर्णेकर, प्रदीप मोरे, श्रवण मोरे, नीलिमा मोरे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापिका सानप, उमाजी जाधव तसेच पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी होते.

## घाटमाथ्यावरून मेंढपाळ रायगड जिल्ह्यात दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळा संपल्यानंतर जानेवारी महिन्यात घाट माथ्यावरून मोठया संख्येने मेंढपाळ रायगडमध्ये उतरतात. घाटावर चाऱ्याची कमतरता व मेंढरांना कोकणात मुबलक चारा उपलब्ध होत असल्याने पुढील चार पाच महिने जनावरे सांभाळून दुग्ध व्यवसाय व त्यातून निर्वाह करण्यासाठी कोकणाची निवड केली जाते.



पावसाळा संपला की मेंढपाळांची पावले कोकणाकडे वळू लागतात. पाठीवर बिऱ्हाड घेऊन कुटुंब कोकणात अनेक वर्षापासून येत आहेत. लोणावळ्यावरून खंडाळामार्गे बोरघाट उतरून मेंढपाळ खोपोलीत येऊन नंतर आजूबाजूचा परिसर, खालापूर तालुक्याचा ग्रामीण भाग तसेच पेण, सुधागड, पनवेल, उरण व कर्जत या तालुक्यांमध्येही वास्तव्य करतात. भातशेती कापल्यानंतर अनेक शेतकरी या मेंढपाळांना आपल्या शेतात बसवतात.

मेंढ्यांच्या लेंड्यापासून तयार होणारे खत शेतीला फायदेशीर असल्याने शेतकरीही मेंढपाळांची वाट पाहतात. या दरम्यान आलेले धनगर व स्थानिकांमध्ये रात्री गप्पाचे फड रंगू लागल्याचे चित्र खालापूर तालुक्यात पहायला मिळत असून कारखान्यांमुळे मोठया प्रमाणात शेती नामशेष झाली असली तरी असलेल्या शेतीमध्ये मेंढर यावीत असा अट्टाहास अनेक शेतकऱ्यांचा आजही कायम असतो. त्यामुळेच मेंढपाळांचे तांडे खालापूर परिसरातील विविध भागात दाखल झाले आहेत.

# रायगडातील शिक्षक रमले खेळांमध्ये!





## क्रिकेट स्पर्धेत मुरूड रिटर्न संघाने मारली बाजी

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शिक्षकांच्या पिकनिक ग्रुपने जिल्हास्तरीय भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. अलिबाग तालुक्यातील परहुरपाडा येथील शिवछत्रपती क्रीडांगणावर रंगलेल्या या स्पर्धेत मुरूड रिटर्न संघाने विजेतेपद पटकावले.

स्पर्धेचे उद्घाटन अलिबागचे गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. या वेळी त्यांनी ताणतणाव दूर शिक्षकांनी खेळाचा पूरेपूर आनंद घ्यावा, असे आवाहन केले.

स्पर्धेत आंदोशी केंद्राने द्वितीय, तृतीय वायशेत संघाने व खानाव केंद्राने चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. मालिकावीर पराग पाटील, उत्कृष्ट फलंदाज मनीष भोईर, तर उत्कृष्ट गोलंदाज प्रवीण भगत ठरला. विजेत्या संघांना आकर्षक स्मृतिचिन्ह भेट देण्यात आले.

या वेळी राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा, पिकनिक ग्रुपचे अध्यक्ष नरेंद्र गुरव, उपाध्यक्ष सुनील पाटील, वैभव पिंगळे, सुबोध पाटील, महेश कवळे, जगदीश चवरकर, शुभम शिवणकर, राजेंद्र साळावकर, सुदर्शन महाडिक, गणेश कमळनाखवा, संतोष पुकळे, चेतन पाटील, विश्वास पाटील, महेश भगत, सुनील काळे, निलेश वारगे, कृष्णकुमार शेळके, जयवंत पाटील, नितीश पाटील, नितीन शेडगे, विनायक भोनकर, रवींद्र साळुंखे, संतोष गावंड, संजय पोईलकर, नितीन पाटील, राजेंद्र पाटील, जगदीश भगत, विश्वास पाटील, रमेश धुमाळ, सुनील माळवी, नरेंद्र पाटील, संतोष जाधव, सचिन कांबळे, उमेश ठाकूर, मनोज कंटक, विजय गुरव, सिद्धेश घरत, निलेश तुरे यांच्यासह दहाहून अधिक संघांचे खेळाडू आणि प्रेक्षक बहुसंख्येने उपस्थित होते. विजेत्या मुरूड संघाचे तालुका गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी अभिनंदन केले.

## खालापुरातही शिक्षकवर्गाने लुटला खेळांचा आनंद

**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वर्धापन दिनानिमित्ताने खालापूर तालुक्यातील शिक्षक व शिक्षिकांनी कलोते येथील मैदानावर एकत्र येत आवडीचा क्रिकेट, बुद्धिबळ, खेळ पैठणीचा आदी खेळांचा आनंद लुटला.

या क्रीडा उपक्रमात १२ केंद्राचा शिक्षकवर्ग व माजी शिक्षक असे २००हून अधिक सहभागी झाले होते. या वेळी पंचायत समिती पोषणाहार अधीक्षक दीपा परब, हर्षाली मोकल, सर्वसाधन व्यक्ती केंद्र प्रमुख म्हस्के आदी उपस्थित होते.



## शिवाई बांधण संघाने स्व. मधुकर ठाकूर स्मृतिचषक पटकावला

**अलिबाग : प्रतिनिधी**

शिवाई क्रीडा मंडळ बांधण संघाने जय हनुमान क्रीडा मंडळ उचेडे संघाचा २०-१८ असा पराभव करून माजी आमदार स्व. मधुकर शंकर ठाकूर स्मृतिचषक पटकावला. बांधणचा राज जंगम याला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले.

अलिबाग तालुक्यातील सातिर्जे येथे श्री स्वयंभू गणेश मित्र मंडळ, जय भवानी क्रीडा मंडळ व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. ७) ही कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पधतील अंतिम सामना शिवाई बांधण व जय हनुमान उचेडे यांच्यात झाला. शेवटच्या चढाईपर्यंत हा सामना रंगला. पूर्वार्धात बांधण संघाने सहा गुणांची आघाडी घेसाठी होती. उत्तरार्धात उचेडे संघाने आपला खेळ उंचावला. उचेडेने बांधण संघावर लोण चढवून १९-१६ अशी आघाडी घेतली. शेवटच्या काही मिनिटात १८-१८ अशी बरोबरी झाली होती. शेवटची चढाई होती तेव्हा बांधण संघाकडे १९-१८ अशी आघाडी होती. या संघाने शेवटच्या चढाईत गुण मिळवून सामना २०-१८ असा जिंकला.

तत्पूर्वी उपांत्य फेरीच्या लढतीत बांधण संघाने नवयुवक क्रीडा मंडळ खिडकी संघाचा पराभव केला. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात उचेडे संघाने धावीर रोहा संघावर मात केली. उचेडेचा सुशांत म्हात्रे याला उत्कृष्ट पकडीचे, तर खिडकी संघाचा निर्देश डाकी याला उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक देण्यात आले. लोकमान्य शिक्षक प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र ठाकूर यांच्या हस्ते स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले.




## राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत सिद्धांत क्लबचे यश

**उरण : रामप्रहर वृत्त**

दिल्ली येथे झालेल्या ६७व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत उरणमधील सिद्धांत सिद्धांत रायफल ॲण्ड फिस्टल शूटिंग क्लबच्या खेळाडूंनी यश मिळविले आहे.

गौरव जगदीश ठाकूर याने १० मीटर एअर फिस्टलमध्ये नॅशनल रीनाउंड शॉट ही पदवी संपादन केली, तर वेदांत खारके, सुप्रीता सुबुद्धी, जयंता साळवे हे विद्यार्थीदेखील नॅशनल रीनाउंड शॉर्ट पदवीस पात्र ठरले आहेत.

सिद्धांत रायफल क्लबचे प्रीतम पाटील, प्रशिक्षक अलंकार कोळी, प्राचार्य गौरी शहा, श्री. कोळी, विश्वजीत, अंबरनाथ चौधरी, समाधान घोपरकर, अतुल मोकल, सुनील मढवी यांनी खेळाडूंना सरावासाठी योग्य ते सहकार्य व मार्गदर्शन केले होते. यशाबद्दल खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.

## सीकेटी कॉलेजचा वार्षिक क्रीडा महोत्सव रंगणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन ९ ते ११ जानेवारीदरम्यान करण्यात आले आहे.

या क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून व्हीडीआयपीएलचे व्यवस्थापकीय संचालक वैभव देशमुख आणि बी.सी. ठाकूर वेअरहाऊसिंग ॲण्ड लॉजिस्टिकचे व्यवस्थापकीय संचालक प्रतिक ठाकूर उपस्थित राहणार आहेत.

या क्रीडा महोत्सवात कबड्डी, खो-खो, कुस्ती, फुटबॉल यांसारख्या १९ प्रकारच्या खेळांच्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांनी केले आहे. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही.बी. नाईक, आयक्यूएसी विभागाचे समन्वयक डॉ. बी.डी. आघाव, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.




## लेदर बॉल टी-२० क्रिकेट स्पर्धा

**खोपोली : प्रतिनिधी**

पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने रसायनी पाताळगंगा येथील नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सिक्युरिटी मार्केटसच्या मैदानावर गुरुवारी (दि. ९) दिवसरात्र लेदर बॉल टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेत अनय स्पोर्ट्स पनवेल, प्रतिक क्रिकेट अकॅडमी आणि पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमी अशा तीन संघांचा सहभाग असणार आहे. दिवसा तीन व रात्री प्रकाशझोतात दोन सामने खेळवले जाणार आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन सुरेंद्र जोशी यांच्या हस्ते, तर बक्षीस वितरण एक्सपेरिटस इन्शुरन्स प्रा. लि.च्या असिस्टंट मॅनेजर नीलिमा घुगरे-सरफरे व लावास लुब्रिकांट्सचे मालक रतन खारोल यांच्या हस्ते होणार आहे.

स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या संघाला तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असल्याची माहिती पीसीएसएचे सचिव सागर कांबळे यांनी दिली.

## आयसीसी रँकिंग : ऋषभ पंत पुन्हा एकदा टॉप-१० फलंदाजांमध्ये



**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसीच्या ताज्या क्रमवारीत भारतीय यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतला मोठा फायदा झाला आहे. पंतने पुन्हा एकदा टॉप-१० फलंदाजांमध्ये धडक मारली. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेंबा बावुमाने इतिहास रचला आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्ध सततच्या खराब कामगिरीनंतर पंत टॉप १० मधून बाहेर पडला होता, पण सिडनी कसोटीनंतर त्याने पुनरागमन केले आहे. पंतने आता नवव्या क्रमांकावर कब्जा केला. इतर भारतीय खेळाडूंबद्दल बोलायचे झाले, तर वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने कोणत्याही भारतीय गोलंदाजाचे कसोटीमधील सर्वोत्तम रेटिंग मिळवले. जसप्रीत बुमराह ९०८ रेटिंग गुणांसह जगातील अव्वल क्रमांकाचा गोलंदाज आहे.

ताज्या आयसीसी क्रमवारीत टॉप ५ फलंदाजांमध्ये कोणताही बदल झाला नाही. इंग्लंडचा जो रूट अव्वल स्थानावर कायम आहे. त्यांच्याच देशाचा हॅरी ब्रूक ८७६ रेटिंग गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. न्यूझीलंडचा केन विल्यमसन ८६७ रेटिंगसह तिसऱ्या क्रमांकावर, भारताची यशस्वी जस्वाल ८४७ रेटिंगसह चौथ्या क्रमांकावर, तर भारताविरुद्ध बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये धडाकेबाज खेळ करणारा ट्रॅव्हिस हेड ७७२ रेटिंग गुणांसह पाचव्या स्थानावर आहे.

फलंदाजांच्या रँकिंगमध्ये दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेंबा बावुमाने मोठी झेप घेतली. बावुमा ७६९ रेटिंगसह सहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे. यापूर्वी तो नवव्या स्थानावर होता. हे त्याच्या कारकिर्दीचे सर्वोच्च रेटिंग आहे. श्रीलंकेचा कामेंदू मेंडिस ७५९च्या रेटिंगसह सातव्या क्रमांकावर पोहचला आहे. ऑस्ट्रेलियाच्या अनुभवी स्टीव्ह स्मिथला बॉर्डर-गावस्कर मालिकेत अपेक्षेप्रमाणे कामगिरी करता आली नाही, ज्यामुळे त्याला एका स्थानाचे नुकसान झाले. तो १४६ गुणांसह आठव्या स्थानावर गेला आहे. न्यूझीलंडचा डॅरिल मिशेल ७२५च्या रेटिंगसह दहाव्या स्थानावर आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com